रायगड, शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

रोषणाईने उजळले रामेश्वर...

● अलिबाग तालुक्यातील चौल येथील प्रसिद्ध व पुरातन रामेश्वर मंदिर त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आकर्षक विद्युत रोषणाईने उजाळून निघाले होते. वेगवेगळ्या रंगांच्या झगमीत रोषणाईने मंदिर आणि परिसर प्रकाशय झाला होता. मंदिरासमोरील तलावात मंदिराच्या उमटलेल्या प्रतिबिंबाने तर आनंद द्विगुणित केला. डोळ्यांचे पारणे फेडणारे दृश्य कॅमेराबद्ध केलेय छायाचित्रकार **सुधीर नाझरे** यांनी.

चेंढरेचा विकास, हाच ध्यास

चित्रलेखा पाटील यांची ग्वाही

प्रचार सभेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। अलिबाग । प्रतिनिधी ।

चेंढरे ग्रामपंचायतीचा विकास हा शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातूनच झाला आहे. येथील रस्ते, पाणी व इतर सुविधा पक्षाच्या मार्फतच देण्यात आल्या आहेत. चेंढरे पंचायत समितीच्या सदस्यांसह आमदार शिंदे गटातील असताना, त्यांनी पाच वर्षांत चेंढरेच्या विकासाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे चेंढरेतील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. चेंढरेचा विकास, हाच ध्यास घेऊन काम करणार, असा विश्वास चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी शुक्रवारी (दि.१५) व्यक्त केला.

महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील यांच्या निवासस्थानासमोर बैठकीचे आयोजन करण्यात आली. यावेळी चिऊताई बोलत होत्या.

यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक ॲड. गौतम पाटील, चेंढरेच्या माजी सरपंच स्वाती पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख शंकर गुरव, चेंढरेचे माजी उपसरपंच यतीन घरत, प्रशांत फुलगावकर, ॲड. परेश देशमुख, एस.एम. पाटील, दत्ता ढवळे, नागेश कुलकर्णी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई म्हणाल्या की, हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा आहे. राज्यातील राजकारण गेल्या पाच वर्षांत बदलले आहे. त्याचा नाहक त्रास सर्वसामान्य जनतेला झाला आहे. ज्यांना निवडून दिले, त्यांनी ●➤ पान २ वर

शिट्टीच्या आवाजाने विरोधकांच्या कानठळ्या बसवा : संजय पाटील

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ चेंढरेमध्ये रॅली काढण्यात आली. या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चित्रलेखा पाटील यांच्यासोबत असल्याचे येथील मतदारांनी रॅलीतूनच दाखवून दिले आहे. चेंढरेमध्ये सुशिक्षित व सुसंस्कृत वर्ग आहे. महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील यादेखील सुशिक्षित आहेत. त्यांनी पाच वर्षांत वेगवेगळी कामे केली. त्यामुळे घराघरात चिऊताईंचे नाव पोहोचले आहे. कोरोना काळात स्वतःच्या जिवाची पर्वा न करता, अनेकांचे जीव वाचविले. पाणी, शिक्षणाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रचंड मेहनत त्यांनी घेतली. आजच्या या रॅलीतूनच उपलब्ध झाली चित्रलेखा पाटील बहुमतांनी निवडून आवाजाने कानठळ्या बसल्या पाहिजे, असे जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील म्हणाले.

(छायाचित्र- समीर मालोदे)

चेंढरेतील मतदारांकडून चिऊताई यांचे स्वागत

महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ चेंढरेमध्ये प्रचार रॅली काढण्यात आली. चेंढरे येथील पाटीलवाडी येथून प्रचारास सुरुवात झाली. आनंदनगर, शिवाजी नगर, गौरव नगर, मूकबधीर विद्यालय, विद्यानगर, गोंधळपाडा, स्वामी समर्थ मठ, सुरुची हॉटेल गल्ली, वरुण सोसायटी, पंतनगर ते जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील यांचे घर अशी ही रॅली काढण्यात आली. रॅलीच्या सोबत दुचाकीवर स्वार होऊन असंख्य कार्यकर्ते, महिला, तरुण सहभागी झाले होते. या रॅलीत युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे आगमन होताच मतदारांकडून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

शिंदे गटाचे रुपेश पाटील शेकापमध्ये

। अलिबाग । प्रतिनिधी ।

खंडाळे ग्रामपंचायतीचे सदस्य रुपेश पाटील यांनी शिंदे गटातील कारभाराला कंटाळून शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा शुक्रवारी सायंकाळी नेहुली येथे संतोष पाटील यांच्या निवासस्थानी पार पडला. खंडाळेचे सरपंच नासिकेत कावजी यांच्या पुढाकाराने शेकापच्या कार्यप्रणालीवर

खुश होऊन रुपेश अनंत पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केल्याने ऐन निवडणुकीत आ. दळवींना मोठा फटका मानला जात आहे.

यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या प्रियदर्शनी पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे माजी ●➤ पान २ वर

नेहुली, खंडाळ्यात जोरदार प्रचार

महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ खंडाळे ग्रामपंचायत हद्दीत शुक्रवारी सायंकाळी प्रचार रॅली काढण्यात आली. दिनानाथ पाटील यांच्या घरासमोरुन रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली सागाव मारूती येथून तळवली, या मार्ग काढण्यात आली.

आजचा अग्रलेख

आपलेच मन खाते आहे

वे|ध|क

शिवशाही-मालवाहतूक ट्रकचा अपघात

अलिबाग : अलिबाग-पेण मार्गावर ट्रक आणि शिवशाही एसटी बसचा अपघात झाला. या अपघातामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी झाली. ही घटना शुक्रवारी दुपारी सागावजवळ घडली. अपघातामुळे या मार्गांवरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती.

अलिबाग आगारातून दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास विनाथांबा शिवशाही एसटी बस पनवेलकडे निघाली होती. दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास सागावजवळ आल्यावर समोरून मालवाहतूक ट्रक आला. या दोन्ही वाहनांची ●➤ पान ५ वर

म्हसळा येथील डॉक्टरांना मारहाण

म्हसळा : ग्रामीण रुग्णालयात बुधवारी (दि.१३) रुग्ण दगावल्याचा ठपका ठेवत वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश मेहता यांना अमानुष मारहाण करण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ श्रीवर्धन, म्हसळा येथील सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी शुक्रवारी (दि.१५) बंद पुकारला होता. हा बंद १०० टक्के यशस्वी झाल्याचे दोनही तालुक्यात दिसून आले.

म्हसळा तालुक्यातील खारगाव बुद्रुक येथील विंचू दंश झालेला चार वर्षांचा मुलगा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे दगावला, असा ठपका ठेवत ग्रामीण रुग्णालय ●➤ पान २ वर

महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांना

आमदार निधीतून समान वाटा देणार

जयंत पाटील यांचे आश्वासन

। मुरूड जंजिरा । प्रकाश सद्रे ।

चित्रलेखा पाटील यांची उमेदवारी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आग्रही मागणी केल्यामुळे देण्यात आली आहे. कार्यकर्त्यांनीच माझ्यावर दबाव आणला म्हणूनच मी अलिबाग मतदारसंघातून चित्रलेखाताईंना उमेदवारी दिली आहे. त्या निवडून आल्यास विधानसभेत माझ्यापेक्षाही जास्त आवाज उठवतील, याबाबत माझ्या मनात शंका नाही. एवढेच नाही तर, त्यांना मिळणाऱ्या आमदार निधीतून महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांना समान वाटा देणार, हा माझा शब्द आहे, असे आश्वासन शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार जयंत पाटील

यांनी गुरुवारी (दि.१४) रोजी मुरूड तालुक्यातील नांदगावमध्ये बोलताना दिले.

नांदगावमध्ये महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे उमेश ठाकूर, ॲड. इस्माईलभाई घोले, शिवसेना उबाठा गटाचे प्रशांत मिसाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नौशाद शाबान, अस्लम हलडे, सरपंच सेजल घुमकर, विजय हिंदी, सुदेश घुमकर, ●➤ पान २ वर

मतदानाकरिता २० नोव्हेंबरला भरपगारी रजा

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील सात मतदार संघाच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, यासाठी बुधवार, दि. २० नोव्हेंबर रोजी लोकप्रतिनिधित्व अधिनियमानुसार भरपगारी रजा देय असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व आस्थापना प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी यांना भरपगारी रजा मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. ●➤ पान २ वर

खासदार तटकरेंनी पिळले आमदार दळवींचे कान?

अलिबाग शहरात महायुती आणि बंडखोरांच्या प्रचाराची टक्कर

। रायगड । खास प्रतिनिधी ।

अलिबाग शहरातील शिवाजी चौकात महायुतीच्या उमेदवारासाठी खासदार तटकरे यांनी गुरुवारी रात्री प्रचारसभा घेतली होती. त्यांचे भाषण सुरु असतानाच अचानक भाजपाचे बंडखोर उमेदवार दिलीप भोईर यांच्या प्रचाराचे वाहन तेथे आले. त्यामुळे खासदार तटकरे यांना भाषण थांबवावे लागले. महायुतीच्या गोटात शांतता पसरली होती, तर काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते संतप्त झाल्याचे दिसून आले. यावेळी खासदार तटकरे यांनी आमदार दळवी यांचे विकासाच्या मुद्द्यावरुन कान पिळल्याचे दिसून आले.

अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीतील शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या विरोधात महायुतीचे महेंद्र दळवी आणि भाजपाचे बंडखोर उमेदवार दिलीप भोईर यांच्यामध्ये खरी लढत होत आहे. मतदानाला आता काहीच दिवस शिल्लक असल्याने प्रचार शिगेला पोहोचला आहे. चिऊताई यांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारल्याने विरोधकांनी याचा धसका घेतला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात महायुतीच्या सभेत तटकरे यांनी आमदार दळवी यांचे विकासाच्या मुद्द्यावर कान पिळले. 'माझे तुम्ही ऐकत नाही, त्यामुळे तुम्हाला तोटा होतो. मी सांगतो त्याप्रमाणे अलिबाग आणि मुरुडमधील विकासाची, रस्त्यांची कामे करा', असे खासदार तटकरे यांनी भरसभेत आमदार दळवींना सुनावल्याचे दिसून आले.

अलिबाग, मुरुड आणि रोहा विभागात चिऊताई यांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. स्वच्छ प्रतिमा, अभ्यासू ●➤ पान २ वर

चित्रलेखा पाटील यांची सडेतोड टीका

आमदार गुवाहाटीला, कारखाने गुजरातला

■ रेवदंडा मोठे बंदर येथे महाविकास आघाडीची सभा

■ जनतेसमोर गंभीर प्रश्न असताना आमदार गप्प

। रेवदंडा । वार्ताहर ।

आमदार होण्यासाठी मतदार संघातील जनतेला अनेक आश्वासने दिली. सत्तेचा उपभोग घेताना मतदारांचा विसर पडला. आम दारकीची पाच वर्षे आश्वासनांचे गाजर पिकवण्यात आमदारांनी घालवली. आता पुन्हा मतदाराच्या दरबारात आणि पदरात तीच आश्वासने घेऊन जाणाऱ्या आमदारांमुळेच मतदारसंघाचा विकास खुंटला आहे. हे जनतेच्या समोर चित्र स्पष्ट झाले आहे. कुठे गेल्या नोकऱ्या, कुठे गेले कारखाने? आमदार गेले गुवाहाटीला व कारखाने गेले गुजरातला, अशी सडेतोड टीका महाविकास आघाडीच्या शेकापच्या

उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार आ. महेंद्र दळवी यांच्यावर केली.

रेवदंडा मोठे बंदर येथील भंडारी समाज सभागृहात महाविकास आघाडीची प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. या सभेत महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्यासह शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, ॲड. गौतम पाटील, सुमित्रा पतसंस्थेचे चेअरम कमळाकर साखळे, राजन वाडकर, सदाशिव मोरे, सुरेश खोत, शरद वरसोलकर, ग्रा.पं. सदस्या जयश्री जायपाटील, हेमंत गणपत आदी मान्यवरांसह रेवदंडा व थेरोंडा विभागीय शेकापक्षाचे कार्यकर्त्या उपस्थिती होती.

महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) व उबाठा गटाच्या पाठिंब्यावर शेकापक्षाच्यावतीने निवडणूक लढवित आहे. महागाईने ग्रासलेल्या माहिला व बेरोजगारीच्या खाईत सापडलेला युवक हे गंभीर प्रश्न महाराष्ट्रासह रायगडला भेडसावत आहेत. अनेक संस्थांच्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. महायुतीच्या नेत्याने रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये नोकरभरती थांबवून स्थानिक युवकांवर ●➤ पान २ वर

आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करा

विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांचे प्रतिपादन

। रायगड । खास प्रतिनिधी ।

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व शासकीय विभागांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सम न्वयाने काम करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे, निवासी उजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांच्यासह विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त राजेश देशमुख मार्गदर्शन करताना म्हणाले की, निवडणुकीतील प्रत्येक दिवस महत्त्वाचा असून, ही निवडणूक इतर निवडणुकीपेक्षा वेगळी आहे. निवडणूक आयोगाने आपल्याला ज्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत, त्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. मतांची टक्केवारी वाढावी यासाठी ●➤ पान २ वर

मोदीयुगाचा अस्त लवकरच

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात महाविकास आघाडीत नेमक्या किती जागा जिंकणार हे आज सांगता येणार नाही; पण लोकसभा निवडणुकीत आम्हाला ४८ पैकी ३१ जागा मिळाल्या. महायुतीला केवळ १७ जागा मिळाल्या. महाराष्ट्रात आजही सत्ताधाऱ्यांविषयी लोकसभेसारखाच मोठा संताप आहे. येथील जनतेला परिवर्तन हवे आहे.

■ शरद पवार यांना विश्वास

त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास देशातील मोदीयुगाचा अस्त होत असल्याचा संदेश जनतेपर्यंत जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका हिंदी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी मोदी युगाच्या अस्ताचे भाकीत वर्तविले. ते पुढे म्हणाले की, बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची पहिली बैठक झाली होती. त्यात नितीशकुमार यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती. भाजपविरोधात एक भक्कम पर्याय उभा करण्याची गरज आहे का, यावर त्यांनी भाषण दिले होते. अशांना सोबत घेऊन मोदी आज नरेंद्र मोदी राजशकट हाकत आहेत. पंतप्रधान मोदी आज देशाचे सरकार चालवत आहेत, पण त्यांच्यावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची मदत घेण्याची वेळ आली आहे. हे दोन्ही नेते एकेकाळी त्यांच्या राजकीय धोरणांवर टीका करत होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

महाराष्ट्रात पैशाच्या जोरावर राजकारण करण्याची परंपरा नव्हती, पण सध्या राज्याची सत्ता ज्यांच्या हाती आहे त्यांनी मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर सुरू केला आहे. हा चिंतेचा विषय आहे. लोकसभेला त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. लोकांनी मतदान आपल्या मतानुसारच केले. हा समजूतदारपणा येथील लोकांमध्ये आहे. त्यामुळे जनता महाविकास आघाडीला संधी देईल, असा ठाम विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत. त्यांनी समाजात फूट पाडण्यापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे. पंतप्रधानपदावर बसलेल्या व्यक्तीला समाजात विद्वेष पसरवण्याची भाषा शोभत नाही. त्यांनी यापासून दूर राहिले पाहिजे, याकडेही शरद पवार यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

चिऊताईंची प्रचारात आघाडी

■ महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारात सर्व कार्यकर्ते प्रचारात आघाडीवर असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून शिवसेना बाळासाहेब ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, आपचे कार्यकर्ते जोरदार प्रचार करीत आहेत. त्यामुळे सर्व ठिकाणी चिऊताईंच्या नावाचा बोलबाला दिसून येत आहे.

शहापूर मतदारसंघात चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांच्या अनेक सभा झाल्या असून, कार्यकर्ते स्थानिक प्रचारात आघाडीवर असल्याचे गावागावात पाहायला मिळत आहे. आपली निशाणी शिट्टी असून, चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांच्या नावासमोरचे तीन नंबरचे बटण दाबा आणि त्यांना भरघोस मतांनी विजयी करा, असा प्रचार करीत कार्यकर्ते मतदारांच्या भेटीगाठी घेताना दिसत आहेत. या प्रचारात पुरुषांबरोबर मोठ्या संख्येने महिला आणि युवादेखील सहभागी होत असल्याचे पाहायला मिळत आहे. या मतदारसंघातील डावली, रांजणरवार, सारळ, रेवस, हाशिवरे, मानकुळे, शिरवली, नारंगी, चिंचवली, पेढांबे, वाघ्रण, कामार्ले, खिडकी, चरी, कुरकुंडी आणि शहापूर ग्रामपंचायतीमध्ये शेकाप नेते जयंत पाटील, पंडित पाटील, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील, जि.प. सदस्या भावना पाटील यांनी असंख्य विकासकामे केली असून, त्याचा फायदा निश्चित चिऊताई यांना होईल, असा आत्मविश्वास कार्यकर्ते प्रचारादरम्यान व्यक्त करीत आहेत.

या मतदारसंघाला विजयाचा वारसा असून, चित्रलेखा पाटील यांनी घेतलेल्या सभांमधून साधलेला संवाद नक्कीच विजयामध्ये भर टाकण्याचे काम करील, अशी चर्चा गावागावात निघालेल्या प्रचार रॅलीमधून अनेक जाणकार बोलताना दिसत आहेत.

बाकड्यावर नाचणाऱ्याला खाली खेचा

आदित्य ठाकरे यांचे मतदारांना आवाहन

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार नितीन यांनी वादळ निर्माण केले आहे. त्यामुळे बाकड्यावर नाचणाऱ्याला खाली खेचा, मशाल जिंकून आणा, असे आवाहन युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले. महाविकास आघाडीच्यावतीने आयोजित केलेल्या जाहीर सभेला महाविकास आघाडीमधील सर्व पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते आणि त्यात मुस्लिम धर्मीय यांनी मोठी गर्दी केली होती.

शिवसेना नेते आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांची जाहीर सभा कर्जत विधानसभा

मतदारसंघाचे उमेदवार नितीन सावंत यांच्यासाठी आयोजित करण्यात आली होती. खोपोली शहरातील आंबेडकर स्मारक येथे आयोजित केलेल्या सभेलामोठी गर्दी जमली होती. शिवसेना उपनेते आ. सचिन अहीर, उमेदवार नितीन सावंत, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, कम्युनिस्ट पक्ष जिल्हा अध्यक्ष ॲड. गोपाळ शेळके, काँग्रेस ज्येष्ठ नेते उल्हास देशमुख, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, रेखा ठाकरे, तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे, उत्तम कोळंबे, शकील कुरेशी, राष्ट्रवादी काँग्रेस कर्जत तालुका अध्यक्ष, सेनेचे खोपोली शहराध्यक्ष मोरे आदी उपस्थित होते.

युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी यावेळी मतदारांना आवाहन करताना टेबलावर चढून नाचणारा पाहिजे का? हे ठरविण्याची वेळ आली आहे, हातवारे करून नाचणारे आपले होणार नाहीत, ठेकेदार, दादागिरी, गुंडाचे राज्य, धमकावले तर जशास तसे उत्तर देऊ. मुंबई अदानीच्या खशात घातले आहे.

खारघर पोलिसांकडून लाखोंची रोकड जप्त

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल विधानसभा निवडणूक विभागांतर्गत पोलीस पथकांतर्गत खारघर हद्दीत गस्तीवर असताना कोपरा गाव येथे सोमोश्वर रेसिडेन्सी सेक्टर १० खारघर या इमारतीच्या खाली रिक्षामध्ये दोन माणसे पैशांची घेणे-देणे करताना संशयास्पद वाटल्याने त्यांची रितसर चौकशी केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांच्याकडील कॅनव्हास बॅगची तपासणी केली असता त्या बॅगेमध्ये ३ लाख ९८ हजार रुपयांची रोख रक्कम आढळून आली. सदरची रक्कम व संबंधितांना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी भरारी पथक यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

काँग्रेसकडून वरदविनायकाला साकडे

। उरण । वार्ताहर ।

रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांनी महड येथे वरदविनायकाचे दर्शन घेतले. यावेही त्यांनी राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येऊन काँग्रेस पक्षाचा मुख्यमंत्री व्हावा, यासाठी वरदविनायकाला साकडे घातले. यावेळी त्यांच्यासोबत रायगड जिल्हा प्रभारी श्रीरंग बरगे, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, गणेश सेवक व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

निजामपुरात स्नेहल जगतापांना मताधिक्य देणार : मोरे

। महाड । वार्ताहर ।

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाड विधानसभा नेते नानासाहेब जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. दरम्यान, निजापूर विभागातून स्नेहल जगताप यांना प्रचंड मोठी मतांची आघाडी मिळवून देणार, असा विश्वास शिवसैनिक अनिल मोरे यांनी व्यक्त केला.

यावेळी काशिनाथ देवघरे माजी ग्रामपंचायत सदस्य, संतोष मोरे, ज्ञानदेव ठूले, विठ्ठल कोपें, पांडुरंग करंजे, रोहित कोपें, राजेंद्र यादव, गंगाराम शेडगे प्रकाश यादव, भुवन शेडगे, दिनकर मोरे, मनोज पेढेकर आदी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवाजी घाग, बाबू साखले, मोरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

चेंढरेचा विकास, हाच ध्यास

जनतेची दिशाभूल करीत बंडखोरी केली. स्वतःच्या स्वार्थासाठी बंडखोरी करणाऱ्या या चोरांना महाराष्ट्रातील जनता माफ करणार नाही. अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा मतदारसंघात होणारी ही निवडणुकीची लढाई एका चोरासोबत असल्याचे दुःख आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, यतीन घरत, ॲड. परेश देशमुख यांच्यासारख्या अनेक शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चेंढरेमध्ये एक वेगळी फळी निर्माण केली. पक्षाच्या माध्यमातून वेगवेगळ्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा कायमच प्रयत्न केला. परंतु, चेंढरेतील प्रश्नांची सोडवणूक करण्यास आमदार महेंद्र दळवी अपयशी ठरले आहेत. आमदारांनी फक्त भूलथापा मारल्या, वेगवेगळी आमिषं दाखविली. प्रत्यक्षात मात्र कोणतीही कामे केली नाही, ही चिंतेची बाब आहे. मोठ्या आशेने मतदारांनी त्यांना निवडून दिले. परंतु, गेल्या पाच वर्षांत आमदारांनी काय केले, असा सवाल येथील जनता उपस्थित करीत आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकर भरतीवर आमदारांनी स्थगिती आणून बेरोजारांच्या पोटावर पाय दिला. महागाईमुळे येथील महिला त्रस्त झाली आहे. महिला सुरक्षेबरोबरच येथील कचरा भूमी व इतर प्रश्नांची पाच वर्षांत सोडवणूक का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. माझ्या शिक्षणाचा उपयोग आमदार म्हणून येथील जनतेच्या विकासासाठी नक्की करेन. चेंढरेचा सन्मान कायमच राखला जाईल. चेंढरेमध्ये सुशिक्षित वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. हाच वर्ग नवा बदल घडवून आणेल, असा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

शिंदे गटाचे रुपेश पाटील शेकापमध्ये

सदस्य ॲड. गौतम पाटील, खंडाळेचे सरपंच नासिकेत कावजी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील पिंट्या ठाकूर, तालुका प्रमुख शंकर गुरव, काँग्रेसचे भरत पाटील, शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष राकेश पाटील, खंडाळे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय थळे, माजी सरपंच मीना पाटील, विलास थळे, विनोद पाटील, विलास वालेकर, नरेश गोंधळी, ग्रामपंचात सदस्य रुचिता भगत, संदेश पाटील, रुपेश पाटील, निलीमा कावजी, राखी गुरव यांच्यासह यशवंत पाटील, दिनानाथ पाटील, अभिजीत पाटील, समीक्षा पाटील, रंजिता पाटील, संतोष पाटील, अनेष पाटील, संतोष गुरव, उदय वेळे, हितेंद्र थळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचार रॅलीला कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. दुचाकीवर स्वार होत लाल बावटा हातात फडकवत चित्रलेखा पाटील यांचा जयघोष करण्यात आला. गळ्यात लाल मफलर घालून प्रचारात असंख्य महिला सहभागी झाल्या होत्या. मतदारांसह कार्यकर्त्यांच्या वाढत्या प्रतिसादामुळे एक वेगळा उत्साह निर्माण झाला होता. अनेकांनी शिट्टी वाजवून झुलाल बावटे की जय, महाविकास आघाडीचा विजय असोफ अशा घोषणा दिल्या. त्यामुळे संपूर्ण खंडाळे महाविकास आघाडी व शेकापमय झाल्याचे दिसून आले.

सागाव मारुती येथून मधलापाडा, रुळे काळोशी, धोलपाडा, पवेळे, साईनगर, खंडाळे, नेहुली अशी काढण्यात आली. रॅलीची सांगता नेहुली येथील संतोष पाटील यांच्या घरासमोर झाली. त्यानंतर रॅलीचे रुपांतर सभेत झाले. प्रचार रॅली, सभांचा जल्लोष खंडाळे, नेहुलीमध्ये पहावयास मिळाला.

आमदार निधीतून समान वाटा देणार

नरेश कुबल, रिझवान फहीम, माजी सभापती चंद्रकांत कमान, प्रणिता पाटील, योगेश पाटील, इम्तियाज मलबारी, विक्रांत कुबल आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

बॅ. अंतुलेंसारखा सेक्युलर नेता मी पाहिला नाही. ते मुख्यमंत्री असताना आम्ही कट्टर विरोधक होतो. असे असतानाही अंतुलेंनी आमच्या संस्थेला दोन शाळा उघडण्याची परवानगी दिली. त्यावेळी विरोध करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी जेथे गरीबांची मुले शिकणार असतील, तर मी कोणत्याही विरोधकाला शाळा परवानगी देण्यास तयार आहे. ही त्यांची गरीबांबद्दल असलेली कणव आणि हाच खरा सर्वधर्मसमभाव जपला. बॅ. अंतुलेंनी ज्यांना मोठे केले, ते त्यांना सोडून गेल्याचे मोठे दुःख त्यांना होते. श्रीवर्धन मतदारसंघातून काँग्रेसच्या मुश्ताक अंतुलेंना तिकीट देण्यात येणार होते, खर्चही मी करेन, असेही सांगितले होते. पण, ते पक्ष सोडून तटकरेंच्या गोटात सामील झाले. हे दुर्दैवी आहे. अंतुले माणूस म्हणून काय होते हे मुश्ताकला कळू नये, याचे आश्चर्य वाटते. बॅ. अंतुलेंनी कौटुंबिक नाते कायमच जपले, असेही जयंत पाटील म्हणाले.

मी काँग्रेसभवनात गेलो, कारण आता आम्हाला आघाडीच्या सर्व घटक पक्षांना बरोबर घेऊन काम करायचे आहे. या निवडणुकीत शेकापपेक्षा काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अधिक जोमाने काम करीत आहेत. शेकापची मते ठाम राहतात, ती फुटत नाहीत. घटक पक्षांची मते बरोबर पडल्यास चित्रलेखा पाटील किमान पन्नास हजारांच्या फरकाने निवडून येतील. तेव्हा निकालाच्या दिवशी मुरुड तालुक्यातील आघाडीच्या जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी गुलाल उधळण्यास अलिबागला यावे, असे निमंत्रणही त्यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी शिवसेनेचे नेते प्रशांत मिसाळ यांचेही भाषण झाले. आमदारांच्या बॅनरवरील किती कामे प्रत्यक्षात झाली आहेत. मुरुड शहर सोडल्यास ग्रामीण भागातील विकास रखडलेलाच आहे. या निवडणुकीत उबाठा सेनेचे कार्यकर्ते गद्दारांना गाडल्याशिवाय राहणार नाहीत. ॲड. घोले यांनी नांदगावमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून आघाडीच्या स्वरूपातच सर्व निवडणुका लढविल्या जातात, असे सांगितले. अस्लम हलडे यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले. यावेळी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

आमदार गुवाहाटीला, कारखाने गुजरातला

अन्याय केला आहे. गुवाहाटीला जाऊन महायुतीची तिजोरी लुटली. ते हिंदुत्व नव्हे तर, ती चोरी आहे. महायुतीचे सरकार महिलांना सुरक्षित ठेवू शकले नाही तसेच बेरोजगारांना नोकऱ्या दिल्या नाहीत. अल्पसंख्याक समाज आणि महिलांचे संरक्षण करणे, सन्मान करणे हे कर्तव्य मानते. महाआघाडीच्यावतीने मशिदीवरचा भोंगा व गणपतीचा ढोलसुध्दा वाजवणार असून, यामध्ये कोणी भांडणे लावणार असतील त्यांना येत्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवून देणार असल्याचे चित्रलेखा पाटील म्हणाल्या. रेवदंडा येथे अद्ययावत मच्छिबाजार बांधण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

मतदानाकरिता २० नोव्हेंबरला भरपगारी रजा

सदर आदेश हा शासकीय आस्थापना, खासगी आस्थापना, रोजंदारीवरील कर्मचारी आस्थापना, दुकाने, कंपनी अशा सर्व आस्थापनांना लागू आहे, ज्या आस्थापनांमध्ये उक्त कामगारांचे अनुपस्थितीमुळे उक्त आस्थापनांचा धोका निर्माण होऊ शकतो अथवा मोठ्या प्रमाणात तोटा होऊ शकतो अशा कर्मचाऱ्यांसाठी लागू नाही, सदर आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापना प्रमुख हे कारवाईस पात्र राहतील, सदरहू आदेश हा अन्य जिल्ह्यात काम करणाऱ्या, परंतु जिल्ह्याच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या आस्थापना प्रमुखांनाही लागू होत आहे, असेही आदेशात म्हटले आहे.

म्हसळा येथील डॉक्टरांना मारहाण

म्हसळाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश मेहता यांना दवाखान्यातच संतप्त जमावाकडून बुधवारी (दि. १३) मारहाण करण्यात आली. एखाद्या डॉक्टरवर हल्ला म्हणजे समस्त वैद्यकीय व्यावसायिकांच्या कर्तव्य दक्षतेवर हल्ला समजून आजचा बंद करण्यात आल्याचे खासगी डॉक्टरांकडून सांगण्यात आले. ग्रामीण तसेच शहरी भागातील रुग्णांचे हाल होऊ नये, यासाठी संप मागे घेऊन त्वरित दवाखाने आणि खासगी लॅब उघडण्यात याव्या, या उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांनी लेखी पत्राद्वारे केलेल्या आवाहनाला सर्वच खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी प्रतिसाद देत आपले दवाखाने उघडून रुग्णसेवा सुरू केली. दरम्यान, घडलेल्या घटनेपासून डॉ. मेथा यांचे हॉस्पिटल बंद आहे. तालुक्यातील अनेक लहान-थोर रुग्णांवर उपचार डॉ. मेथा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहेत. अनेक रुग्णांना काय उपचार द्यायचे, हे डॉ. मेथा यांना पूर्णपणे माहीत असल्यामुळे तालुक्यातील नागरिकांनी डॉ. मेथा यांनी आपला व्यवसाय पूर्ववत सुरु करावा, अशी मागणी केली आहे.

शिवशाही-मालवाहतूक ट्रकचा अपघात

समोरासमोर धडक लागली. या धडकेत दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. एसटीतील प्रवासी किरकोळ दुखापत वगळता सुखरूप असल्याची माहिती आगारातून देण्यात आली आहे. या अपघातामुळे मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक कोंडी सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.

खासदार तटकरेंनी पिळले आमदार दळवींचे कान?

व्यक्तिमत्त्व तसेच दूरदृष्टी असणारा उमेदवार म्हणून मतदार चिऊताई यांच्याकडे आशेने पाहात आहेत. मतदारसंघाचा त्याच विकास करु शकतील, अशी खात्री झाल्याने विविध प्रचारसभांमध्ये गर्दी वाढत असल्याचे दिसून येते.

पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे त्या अख्खा मतदारसंघ पिंजून काढत आहे. मतदारांच्या अडीअडचणी समजून घेत आहेत. विशेष करुन युवा आणि महिला मतदारांच्या त्यांना सभेच्या ठिकाणी गराडा पडत आहे. चिऊताई यांच्या वाढत्या लोकप्रियतेचा विरोधकांनी धसका घेतला असल्याचे दिसते. महायुतीच्या प्रचारसभांमधून सातत्याने टीका-टिप्पणी करण्यात येत आहे. परंतु, चिऊताई यांच्या भाषणांमध्ये अलिबाग विधानसभेचे व्हीजन उभे केले जात असल्याने ते मतदारांना अधिक भावत आहे. आमदार महेंद्र दळवी यांनी गेल्या पाच वर्षांत जनतेसाठी कोणतेच ठोस काम न केल्याने या निवडणुकीत मतदार त्यांना नाकरण्याची शक्यता असल्याची जोरदार चर्चा आहे.

आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करा

दिव्यांग मतदार, ८५ वर्षे वयावरील ज्येष्ठ नागरिकांना आयोगाने घेरून मतदान करण्याची (होम वोटिंग) सुविधा दिली आहे. दिव्यांग मतदारांचे १०० टक्के मतदान होईल या दृष्टीने नियोजन करावे. दिव्यांगांना सहजतेने मतदान करता यावे यासाठी त्यांना द्यावयाच्या सुविधा सर्व म तदान केंद्रांपर्यंत उपलब्ध करण्यात याव्यात. तसेच मतमोजणी झाल्यानंतर व्हीव्हीपॅट व ईव्हिएम मशीन स्ट्राँगरुममध्ये व्यवस्थितपणे ठेवण्याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. मतदानावेळी एखादी मशीन बंद पडल्यास ती मशीन तात्काळ दुरुस्त करण्याची कार्यवाही झाली पाहिजे, याकडे विशेष लक्ष द्यावे. सर्व यंत्रणांनी लोकसभा निवडणूक-२०२४ मध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने काम केल्याबद्दल विभागीय आयुक्त श्री. देशमुख यांनी सर्वांचे अभिनंदन केले. मागील निवडणुकीच्या तुलनेत या निवडणुकीतील मतदान अधिक व्हावे, या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे सर्वांनी लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पोस्टल व होम वोटिंग द्वारे होणारे मतदान मतपत्रिकेवर होत असून, या दृष्टीने यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांनी काळजीपूर्वक काम करावे. सी-व्हीजील, आचारसंहिता कक्ष, जिल्हा निवडणूक सनियंत्रण कक्ष याकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी सोडविण्यासाठी सतर्कता राखावी, अशा सूचना विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी जावळे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निवडणूक विषयक विविध समितीनिहाय कामकाजाची माहिती दिली. जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष, मतदार जागृकता व सहभागिता कार्यक्रम (स्वीप), सी व्हिजील ॲप, सक्षम ॲप, ईव्हीएम, ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदार यांचे मतदान, पोस्टल मतदान व होम वोटिंग प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सरमिसळ प्रक्रिया, सूक्ष्म निवडणूक निरीक्षक प्रशिक्षण यासह विविध बाबींची माहिती दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडाबाबतची माहिती दिली.

गावागावात रंगू लागल्या प्रचाराच्या चर्चा

। पाताळगंगा । वार्ताहर ।

विधानसभा मतदानाला काही दिवसांचा अवधी असल्यामुळे जिकडे-तिकडे निवडणुकीच्या चर्चा सुरु असून, अनेक ठिकाणी तर्क-वितर्क काढले जात आहेत. २० तारखेला मतदान होणार आहे. पक्षाचे कार्यकर्ते मतदारराजापर्यंत आपला प्रचार पोहोचवित असताना प्रत्येक गावातील किती मतदान होईल. कुणाचे पारडे किती जड आहे. या निवडणुकीत कोण बाजी मारणार? कुणाची रॅली मोठी होती, यावरून आपलाच पक्ष निवडून येणार अशा गप्पांचाच फड रंगलेला अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांची मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढली असून, यामध्ये युवक मतदारांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत असल्यामुळे ग्रामीण भागात आपलाच उमेदवार विजयी होणार चावडी, हॉटेल, पानटपऱ्या व कट्ट्यावर विविध पक्षाचे समर्थक विजयाचे गणित मांडत असून, दावे-प्रतिदावे केले जात असल्याचे दिसून येते.

अमित शाह यांनी महाराष्ट्र अदानीला विकला

। यवतमाळ । वृत्तसंस्था ।

राज्यातील महायुती ही महापापी असून, केवळ लुटण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यासाठीच भाजपने येथील पक्ष फोडले, आमदार, मुख्यमंत्री विकत घेतले. दिल्लीत बसून अमित शहा यांनी महाराष्ट्र हा उद्योगपती गौतम अदानीला विकला. या सौद्यात अडथळा नको, म्हणून पक्ष फोडून सोयीच्या व्यक्तीच्या हाती महाराष्ट्राची सत्ता दिल्याचा घाणाघाती आरोप कन्हैया कुमार यांनी केला. गुरुवारी यवतमाळ येथे महाविकास आघाडी उमदेवाराच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

देशात आणि राज्यात धर्माच्या नावावर धंदा केला जात आहे. आम्ही आमचा धर्म वाचवू, पण आमची शेती, व्यापार, रोजगार तुम्ही वाचवणार का, असा प्रश्न त्यांनी यावेळी बोलताना केला. यवतमाळ जिल्हा हा येथील शेती, खनिज यासाठी प्रसिद्ध आहे. त्यानंतरही या जिल्ह्याची अवस्था बकाल झाली आहे. येथे भाजपचे कमळाचे फूल उगवले अन् दहशत, गुंडागर्दीचे पीक येथे आले आहे. या सर्व समस्यांचे उत्तर मतदानाच्या दिवशी द्यायचे आहे, असे आवाहन डॉ. कन्हैया कुमार यांनी केले.

शेतकऱ्यांच्या तुरीला भाव नाही, तिकडे डाळीचे दर दुप्पट केले आहेत. शेतकरी व नागरिक

■ कन्हैया कुमार गरजले

या दोघांचीही लूट हे सरकार करत आहे. महागडे शिक्षण घेऊन रोजगार मिळत नाही. देशात मागील ४५ वर्षांत कधीच निर्माण झाली नाही, इतकी बेरोजगारी या दहा वर्षांत वाढली आहे. यावर उत्तर देण्याऐवजी सत्ताधारी प्रत्येक मुद्दा धार्मिकतेकडे नेऊन वाद निर्माण करण्याचे काम करत आहेत. आता हे संकट महाराष्ट्रातील संस्कृती व पंपरेवर आले आहे. परिवर्तनाची ज्योत महाराष्ट्रातूनच पेटली जाणार आहे, कारण विदर्भ हा फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची नर्सरी आहे. येथील समरसता विचारच येत्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देईल, असे कन्हैया कुमार म्हणाले.

सभेचे प्रास्ताविक माजी आमदार कीर्ती गांधी यांनी केले. सभेला खासदार संयज देशमुख, तेलंगणाचे आमदार डॉ. ओम श्रीक्रिष्णा, माजी आमदार ख्वाजा बेग, महाविकास आघाडीचे उमेदवार बाळासाहेब मांगुळकर, अखिल भारतीय युवक काँग्रेसचे सचिव असिल अली खान आदी उपस्थित होते.

कोळी समाजाच्या पाठीशी शेकाप कायम

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे आश्वासन

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

कोळी बांधव हे अलिबाग-मुरूड-रोहा मतदार संघातील आन, बान आणि शान आहेत. त्यांना अपशब्द वापरणे म्हणजे कुसंस्कृतपणाची लक्षणे आहेत. कोळी बांधवांवर आज दडपशाही आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, दडपशाही तोच करतो जो घाबरलेला असतो. आणि आ. दळवींचीदेखील तीच अवस्था आहे. परंतु, कोळी बांधवांनी घाबरायचे काहीच कारण नाही. कारण, त्यांच्या पाठीशी शेकापसह महाविकास आघाडी ठामपणे उभी असल्याचे वक्तव्य महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले आहे.

अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील प्रचार दौऱ्यादरम्यान गुरूवारी (दि.१४) साईनगर येथे झालेल्या प्रचार सभेत त्या बोलत होत्या.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई म्हणाल्या की, आज जे राज्यात चालू आहे, ज्या पद्धतीने राजकारण चिखलात लोळत आहे, यावर मात करण्यासाठी आणि विकास कामे करण्यासाठी शेकाप, काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) हे सर्व पक्ष महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्र आले आहेत. भविष्यात होणाऱ्या मुंबईची समस्या सोडवायची असेल तर या मतदार संघाला सुशिक्षीत उमेदवाराची गरज आहे. कारण तो विधानसभेत बोलू शकतो, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

पुढे त्यांनी सांगितले, मागील पाच वर्षात ज्यांना निवडून दिले, त्यांनी आमदार म्हणून विधान भवनात एकही प्रश्न मांडला नाही. वादळात येथील सुपारींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यांना पाहिजे तशी नुकसान भरपाई मिळाली नाही. याला कारण राज्यातील निष्क्रीय राजकारण हेच आहे. यावेळी महाराष्ट्रातील काही राज्यकर्ते पक्ष आणि घरे फोडण्यात तसेच गुवाहाटीला जाण्यात व्यस्त होते. यामुळे त्यांना सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडून सोडविण्यासाळी वेळच मिळाला नाही. दु:ख या गोष्टीचे आहे की, दिवसा उजेडी या महाराष्ट्रात चोरी होते. काही मुठभर आमदार येऊन महाराष्ट्राची तिजोरी उघडतात आणि ५०-५० खोके घेऊन गुवाहाटीला जातात. महाराष्ट्रातील कारखाने गुजरातला जातात ही चिंतेची बाब आहे.

आमदारांनी कोळी बांधवासाठी अपशब्द वापरले होते. लोक प्रतिनिधींनी कोणाच्याही जातीवरून बोलणे ही अलिबाग तालुक्याची संस्कृती नाही. याचा स्विकार सर्वसामान्य जनता अजिबात करणार नाही. कोणी कोणाच्या पोटावर पाय मारत असेल तर ते चुकीचे आहे. मासेमारी हा त्यांचा व्यवसाय आहे, त्याने कमवले पाहिजे. कारण या कमाईवर त्यांचे घर चालते आणि मुलांना शिक्षण दिले जाते. आमदार त्यांची मदत करण्याऐवजी त्यांच्यावर दडपशाही आणत आहेत. आणि दडपशाही तोच करतो जो घाबरतो. विद्यमान आमदारांचे देखील तेच झाले आहे. यामुळे जनता या चोरांवर प्रचंड नाराज आहे, अशी टिका करत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी दळवी यांचा जाहीर निषेध केला. त्या म्हणाल्या की, कोळी बांधवांना माझा शब्द आहे की, मी निवडून आले तर तुम्हाला माझी दहशत वाटणार नाही. यामुळे २० तारखेला मतदान करताना या सर्वांचा विचार करून मतदान करण्याचे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले.

यावेळी शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते द्वारकानाथ नाईक, ॲड. गौतम पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, आश्लेषा नाईक, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख शंकर गुरव, ग्रामपंचायत सदस्य, शेकापसह महाविकास आघाडीतील घटक पक्षांतील कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार होण्याची एक संधी द्या: प्रीतम म्हात्रे

। उरण । प्रतिनिधी ।

उरण मतदार संघात बेरोजगारीचा प्रश्न मोठा आहे. हा बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी मला आमदार होण्याची एक संधी द्या. त्या संधीचे मी नक्कीच सोने करून दाखवीन, अशी ग्वाही उरण विधानसभेचे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी दिली. प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचार दौऱ्याचा झंझावात तालुक्यात सुरू असून, गुरुवारी (दि.१४) उरण पूर्व विभागातील पुनाडे, चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, खोपटे, गोवठणे, तसेच या भागातील अन्य गावांना भेटी देऊन मतदारांच्या गाठी भेटी घेतल्या. त्यावेळी ते चिरनेर येथे झालेल्या छोटेखानी सभेत मतदारांशी बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, मी निवडून आल्यावर मला कमिशन खायचे नाही किंवा आमदार म्हणून नुसते मिरवायचे नाही. तर, येथील तरुण वर्ग माझ्या प्रचारात, कुठल्याही पक्षाचा विचार न करता एकवटला असून, त्यांच्या भवितव्यासाठी मला काम करायचे आहे. येथील तरुणांना प्रशिक्षणा अभावी नोकऱ्या मिळू शकत नाहीत. त्यासाठी त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे काम करत असहे. यातून त्यांना नोकरीची संधी मिळेल. गरीब गरजू आणि सर्वच लोकांसाठी मला काम करायचे आहे. गरिबांच्या ज्या काही छोट्या मोठ्या गरजा आहेत. त्या पूर्णत्वास नेण्याचा माझा मानस आहे. गेल्या पाच वर्षात विद्यमान आमदारांनी आम्हीच निधी आणला, आम्हीच विकास कामे केली, असा डांगोरा पिटला. तसेच, विद्यमान आमदारांची जीभ देखील घसरत चालली आहे. ते येथील आगरी, कोळी, कराडी समाजाबद्दल बेताल वक्तव्य करत आहेत. याची चिड येते. त्यामुळे विद्यमान आमदारांच्या विरोधात तालुक्यात प्रचंड नाराजी आहे. ही घमेंड, मस्ती आता आपल्याला सर्वांनी मिळून उतरवायची असल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी रमाकांत पाटील, शुभांगी पाटील, सुरेश पाटील, अरुण पाटील, प्रफुल्ल खारपाटील, दीपक कातकरी, अनिल पवार, अरुण शिंदे, प्रशांत खारपाटील, अनंत नारंगीकर, प्रदीप पाटील, राजू ठाकूर, अमित मुंबईकर, दामोदर मुंबईकर, प्रदीप ठाकूर, भास्कर ठाकूर, अजित म्हात्रे, पद्माकर ठाकूर उपस्थित होत.

● खोपटे येथील अनेकांनी उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खोपटे येथील कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. प्रीतम म्हात्रे यांना या निवडणुकीत विजयी करायचे आणि आमदार बनवायचे, असा ध्यास या तरुणांनी घेतला आहे.

● करंजाडे येथील रिक्षा युनियनचे अध्यक्ष अशोक विखारे, कल्पेश गायकर, सुनील गायकर, राकेश गायकर, अरुण पारधी, नितीन साबळे, राजेश वाभळे, बशीर साठी, अनिल कचरे, महेश मुने, दिलीप बोरकर, संतोष जाधव, सुरेंद्र विश्वकर्मा, दीपक गायकवाड, धीरज पाटील, शरद फडके, सुभाष पवार, दीपक गायकवाड यांच्यासह उबाठाचे करंजाडे उपशहर प्रमुख नितेश जाधव यांनी शेकापत प्रवेश केला.

अतुल म्हात्रे यांना वाढता प्रतिसाद

। कोलाड । वार्ताहर ।

पेण-रोहा आणि सुधागड विधानसभा मतदारसंघाचे शेकापचे उमेदवार अतुल म्हात्रे यांच्या प्रचाराला जनतेतून वाढता प्रतिसाद मिळत आहे. पेण मतदार संघात भाजप उमेदवार रविशेठ पाटील यांना भाजपने दिलेल्या आश्वासनाकडे लक्ष देत निवडून दिले होते. मात्र, दिलेल्या आश्वासनाकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याने पेण मतदार संघात कोणत्याही विकास कामांवर सर्वत्र नाराजी व्यक्त केली जात आहे. भाजपवर मतदारांची नाराजी असल्याचा फायदा शेकापचे उमेदवार अतुल म्हात्रे यांना होऊ शकतो, असा अंदाच कार्यकर्त्यांना वाटत असल्याने ते अतुल म्हात्रे हे गावोगावी जाऊन गाठीभेटी घेत आघाडी घेत असल्याचे दिसून येत आहे.

यावेळी अतुल म्हात्रे यांनी रोहा तालुक्यातील आंबेवाडी जिल्हा परिषद मतदार संघात, खांब आणि आंबेवाडी पंचायत समिती गणात तसेच सुतारवाडी, येरल, पहूर, कोलाड, आंबेवाडी, खांब, विठ्ठलवाडी, रजखलाटी, मेढ विभाग, मालसई, उडदवणे, देवकान्हे, चिल्हे, तळवली तर्फे अष्टमीसह सर्व भागातील गावागावांत मतदारांच्या गाठी भेटी घेतल्या. यावेळी घरोघरी केलेल्या प्रचारात सर्व नागरिकांनी उच्च शिक्षित आणि सामाजिक बांधिलकी म्हणून अतुल म्हात्रे यांना वाढता पाठिंबा तसेच प्रतिसाद मिळत आहे.

तटकरेंनी कोणालाही मोठे केले नाही

अनिल नवगणे यांची जारेदार टिका

। माणगाव । प्रतिनिधी ।

सुनील तटकरेंनी कोणालाही मोठे केले नाही, केवळ आपल्या कुटुंबातील व्यक्तींनाच मोठे केले. त्यामुळे त्यांची जागा या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने दाखविण्याची हि योग्य वेळ असल्याची जोरदार टिका मतदार संघातील मविआ पुरस्कृत राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार अनिल नवगणे व ज्ञानदेव पवार यांनी जुने माणगाव येथील गाव बैठकीत बोलताना केली.

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मविआचे उमेदवार अनिल नवगणे यांच्या प्रचारार्थ जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे गुरुवारी (दि.१४) रोजी गाव बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी मार्गदर्शन करताना अनिल नवगणे म्हणाले कि, मला आघाडीतील सर्वच पक्षांचा तसेच मित्र पक्षांचा चांगला पाठिंबा मिळत आहे. या मतदार संघातील जनतेला आता बदल हवा असल्याचे दिसून आले आहे. कुणबी समाज, मुस्लिम समाज, बौद्ध समाज यांसह सर्वच समाज बांधवांचा मला पाठिंबा मिळत आहे. या मतदार संघात कोणताही रोजगार मिळत नसल्याने सुशिक्षित बेरोजगार तरुणांमध्ये प्रचंड नाराजी आहे. विकास कामांबरोबरच रोजगाराची निर्मिती करायची आहे. तटकरेंचा ७० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टचार मोदींनी बाहेर काढणार असे सांगितल्यावर चौथ्याच दिवशी तटकरे मोदींच्या मांडीवर जाऊन बसल्याची टीका त्यांनी केली आहे.

● शेकापचे नेते सुरेश खैरे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून नवघर ग्रामपंचायत मधील धोंडीवली येथील नागेश जाधव, सूरज जाधव, गणेश जाधव, विरेश्वर तेलंगे, प्रवीण तेलंगे या तरुणांनी शेकापक्षात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी नगर-सेवक सुमेध खैरे, जनार्दन जोशी, मिलिंद शेळके, संतोष धाटावकर, सुधीर साखरले, स्वराज मेहता आदी उपस्थित होते.

प्रश्न सोडविण्यात शेकाप आघाडीवर

सचीन ताडफले यांचे प्रतिपादन

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्याच्या विकासाकडे येथील थापेबाज आमदाराचे दुर्लक्ष झाल्यामुळे तालुका विकासाच्या प्रक्रीयेतून १० वर्ष मागे गेला आहे. या तालुक्याला विकासाच्या प्रक्रीयेत आणून तालुक्याचा विकास साधण्याची ताकद फक्त प्रीतम म्हात्रे याच्यांमध्येच आहे, असा ठाम विश्वास सचीन ताडफले यांनी पुनाडे ग्रामस्थांसमोर बोलताना व्यक्त केला आहे. उरण विधानसभेचे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या निवडणूक प्रचारानिमीत्त पूनाडे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बोलताना सचीन ताडफले म्हणाले की, उरण तालुक्याचा विकास केवळ मा.आ. विवेक पाटील यांनीच केला आहे. नंतरच्या काळात आलेल्या आमदारांनी लोकांच्या गरजांकडे व विकासाकडे दुर्लक्ष केले आहे. शेकापकडे कुठलीच सत्ता नसली तरी शेकापची नाळ सर्वसामान्य जनतेशी असल्याने जनतेचे प्रश्न सोडविण्यात शेकाप आघाडीवर असतो. महायुतीच्या दोन्ही उमेदवारांमध्ये काम करण्याची उर्जा राहिलेली नाही, त्यांना घरी बसवून तरूण नेता प्रीतम म्हात्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रीतम म्हात्रे आमदार होणे गरजेचे

रमाकांत म्हात्रे यांचे प्रतिपादन

। उरण । प्रतिनिधी ।

लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ थोड्याच दिवसांत सुरू होणार आहे. याठिकाणी २५ हजारपेक्षा जास्त नोकर भरती आणि रोजगार उपलब्ध होणार असून येथील स्थानिकांनाच मिळाला पाहिजे. यासाठी भूमिपुत्रांसाठी आवाज उठवणारा लोकप्रतिनिधी म्हणून प्रीतम म्हात्रे यांनाच निवडून देऊन त्यांनी आमदार होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन उरण तालुका युवक अध्यक्ष रमाकांत म्हात्रे यांनी केले आहे.

ते पुढे म्हणाले की, जेएनपीटीमध्ये जवळपास साडेतीनशे कामगार काम करत आहे. यात एकही स्थानिक कामगार नसून सर्व गुजरातवरून आलेले कामगार आहेत. तेथील आमदार, खासदार, मंत्री आपला मतदारसंघ शाबूत ठेवण्यासाठी तिथल्या तरुणांना याठिकाणी रोजगार देण्याचा प्रयत्न करतात. याला आपल्या लोकप्रतिनिधीने विरोध करून तो रोजगार येथील भूमिपुत्राला मिळावा म्हणून प्रयत्न करायला पाहिजे. पण दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता असल्याने तेरी भी चुप, मेरी भी चुप अशा पद्धतीने स्थानिकांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सांगितले.

हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी निवडून द्या

चित्रलेखा पाटील यांचे आवाहन

● अलिबाग-मुरूड आणि रोहा विधानसभा मतदार संघातील मविआ पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.१५) सकाळी मुरूड शहरातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीला महाविकास आघाडीचे पदाधिकारी, पुरुष आणि महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या अभूतपूर्व रॅलीने मुरूडमधील नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

विधानसभेचे नेतृत्व करणाऱ्या आमदारांनी मागील पाच वर्षात अधिवेशनात एकही प्रश्न उपस्थित न करुन लोकांच्या प्रातिनिधित्वाचा अवमान केला आहे. परिणामी, मतदार संघातील विकास खोळंबला आहे. अलिबाग-मुरूड-रोहा मतदार संघातील जनता हि सुज्ञ आहे. त्यामुळे मतदार संघातील कार्यभार गतिमान करण्यासाठी मला एक संधी द्या. तसेच, या मतदार संघातील हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी लोकांनी बहुमताने मला निवडून द्या, असे आवाहन अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदार संघातील मविआ पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले आहे.

महाविकास आघाडीतर्फे मुरुड शहरात शुक्रवारी (दि.१५) सकाळी रॅलीचे आयोजन करण्यात आले होत. मुरुड शहराची ग्रामदेवता कोटेश्वरी मंदिराकडून बाईक रॅली संपूर्ण शहरात फिरवण्यात आली. बाजारपेठ येथील पक्ष कार्यालयात जनतेशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

यावेळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी सांगितले की, व्यापारी वर्गाला माझ्याकडून कोणताही त्रास दिला जाणार नाही. व्यापारी लोकांना जो विकास आवश्यक आहे. त्यावर त्यांच्याशी चर्चा करून त्यावर निर्णय घेऊन सर्वसमावेशक निर्णय घेतले जातील. या विधानसभा क्षेत्रातील मुस्लिम समाजास मानाचे स्थान देणार असून समान न्यायतत्वावर कार्यभार चालवणार आहे. महिलांची सुरक्षितता व रोजगार देण्यासाठी मी विशेष प्रयत्न करणार आहे. तसेच, हुकूमशाही व गद्दार सरकारला घरचा रस्ता दाखवा, असे आवाहन यावेळी चित्रलेखा पाटील यांनी केले.

या रॅलीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आदेश दांडेकर, प्रमोद भायदे, मुग्धा जोशी, विश्वास चव्हाण, कुणाल सतविडकर, विजय वाणी, मनोहर बैले, मनोहर मकु, तुकाराम पाटील, विजय गिदी, माजी सभापती चंद्रकांत कमाने, राहील कडू, श्रीकांत वारगे, इस्माईल शेख आदी उपस्थित होते.

आपलेच मन खाते आहे

कितीही निर्ढावलेला गुन्हेगार असला तरी त्याला आपले मन खात असतेच. काही वेळेला तो उघड कबुली देतो, काही वेळेला मनातल्या मनात. राज्याचे सध्याचे सत्तारुढ नेते म्हणजेच महायुतीवाले यांना गेल्या अडीच वर्षात केलेली पापे आठवत आहेत. सध्याच्या प्रचारात ते कळत-नकळत कबुल्या देत आहेत. पण ते करतानाही मखलाशी करायचा प्रयत्न चालू आहे. भाजपसोबत जाण्याची योजना शरद पवारांनीच ठरवली होती असा आरोप अजित पवारांनी पुन्हा एकवार केला आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही त्याला दुजोरा दिला आहे. अजितदादांनी एका मुलाखतीत हा गौप्यस्फोट केला. असे स्फोट नेहमी इंग्रजी किंवा हिंदीत दिलेल्या मुलाखतीमध्ये होतात. याचे कारण आपल्या नेत्यांना या दोन्ही भाषा नीट बोलता येत नाहीत. मग मुलाखतकार काहीतरी प्रश्न विचारतो आणि त्याला उत्तर देताना शब्द निसटतात. आताही दादांचे तसेच झाले. २०१९ च्या घटनाक्रम दादांनी पुन्हा एकवार सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या निवडणुकांनंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपची साथ सोडल्याने बराच काळ सरकार स्थापन होईना. त्यावेळी राष्ट्रवादीने भाजपला पाठिंबा द्यावा असे ठरले व ही बैठक उद्योगपती अदानी यांच्या घरी झाली असे दादांचे म्हणणे आहे. बाकी बैठकीबाबतचे आणि खुद्द शरद पवारांनीच असा प्रस्ताव मांडला होता असे आरोप दादांनी पूर्वीही केले होते. पण या बैठकीला अदानी हजर होते हा तपशील नवा होता. त्यामुळे साहजिकच देशभर गदारोळ झाला. मग अदानींच्या घरी किंवा गेस्ट हाऊसवर ही बैठक झाली. मात्र त्यावेळी अदानी हजर नव्हते असा खुलास दादांना करावा लागला. शरद पवारांनीही अशी बैठक झाल्याचे मान्य केले. पण भाजपवाले इडीच्या धमक्या देत असल्याने राष्ट्रवादीच्या काही नेत्यांमध्ये भीती होती व म्हणून भाजपचा प्रस्ताव काय आहे हे समजून घेण्यासाठी त्यांच्यासोबतच्या बैठकीत आपण सहभागी झालो असे शरद पवारांनी म्हटले आहे.

चर्चा आणि अंतिम कृती

आपण महायुतीत सामील झालो याबद्दल दादांना अजूनही मन खात आहे. त्यामुळे शरद पवारांचीच अशी इच्छा होती असे म्हणून ते सर्व दोष त्यांच्यावर ढकलण्याचा प्रयत्न करीत असतात. राजकारणात सर्वच नेते एकमेकांना भेटत असतात. चर्चा चालू असतात. पण शेवटी प्रत्यक्ष निर्णय काय घेतला जातो व कृती काय केली जाते यालाच सर्वाधिक महत्व असते. शरद पवार यांनी म्हटल्याप्रमाणे ते भाजपसोबतच्या चर्चेत सहभागी झालेही असतील. पण भाजपबरोबर जाण्याबाबत त्यांनी कधीही जाहीर विधान केलेले नव्हते. किंबहुना, तेव्हा आणि नंतर त्यांनी ठामपणे भाजपच्या विरोधात लढण्याची भूमिका घेतली आहे. वास्तविक शरद पवार यांनी तेव्हाच भाजपसोबत युती केली असती तर त्यांना कितीतरी लाभ झाले असते. अगदी अलिकडे अजितदादांनी पक्ष फोडल्यानंतरही शरद पवारांचा गट शक्तिहीन झाला होता. काका आता संपले असा दादांचा आविर्भाव होता. पण शरद पवार यांनी पुन्हा नव्याने पक्ष उभा केला. लोकसभेला ते ठामपणे इंडिया आघाडीत राहिले. मोदींच्या भाजपसोबत आपण युती करू शकत नाही हे त्यांनी अनेकदा निःसंदिग्धपणे स्पष्ट केले आहे. आतादेखील ते महाविकास आघाडीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. असे असूनही त्यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण करण्याचा प्रयत्न करणे ही दादांची मजबुरी आहे. कारण, त्यांना आपल्या स्वतःच्या पापाचे समर्थन करायचे आहे. आज महायुतीमध्ये त्यांची प्रचंड पंचाईत झाली आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात नेहमीप्रमाणे भाजपवाल्यांनी मुस्लिमविरोधी बोलून वातावरण तापवले आहे. मोदींनी कालच्या सभेत त्यासाठीच औरंगजेब व संभाजीराजे यांचा विषय काढला. योगी आदित्यनाथ बटेंगे तो कटेंगे म्हणून गेले. लगेच असला प्रकार महाराष्ट्रात चालू शकत नाही असा खुलासा दादांना करावा लागला. नबाब मलिक यांना तिकिट देण्यावरून भाजपने अकांडतांडव केले. दादांना त्यांचा प्रचार करावाच लागला. आपण केवळ विकासाच्या मुद्द्यावर भाजपसोबत आहोत हे त्यांना पुन्हापुन्हा सांगावे लागते.

मोदींचे मार्केट डाऊन

महायुतीतील एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांचीही हीच स्थिती आहे. यांच्या जाहिरातीत यांना बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो सर्वात ठळकपणे छापावा लागतो. या निवडणुकीत मोदींचे नाणे चालत नाही. त्यांचे मार्केट एकदम डाऊन आहे. त्यामुळे यावेळी मोदी की गॅरंटी वगैरे काही नाही किंवा सर्वत्र त्यांचे फोटोही नाहीत. उलट बाळासाहेब ठाकरे यांच्या जोडीने आनंद दिघे यांचाही फोटो झळकवावा लागतो. याच दिघे यांनी ठाण्यातून जनसंघ आणि भाजपला संपवले. ठाणे व कल्याणच्या जागा शिवसेनेकडे खेचून आणल्या. आता त्यांचा फोटो भाजपच्या जाहिरातीत नरेंद्र मोदींच्याही वर लागतो आहे. गंमत म्हणजे, मोदींच्या भाषणामधून उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावरची टीका गायब आहे. लोकसभेला शरद पवारांना मोदींनी भटकती आत्मा, भ्रष्टाचारी वगैरे म्हटले होते. उद्धव ठाकरे हे बाळासाहेबांचे नकली संतान आहेत असे मोदी व शाह यांनी म्हटले होते. उद्धव यांच्या आजारपणात त्यांनी आपल्याला कसा फोन केला होता अशा कथा सांगितल्या होत्या. त्या सर्वांचा विपरीत परिणाम झाला होता. त्यामुळे मोदी सध्या केवळ काँग्रेसवर टीका करीत आहेत. सेना व राष्ट्रवादी फोडले असले तरी लोकांमध्ये कोणताही संताप वा सहानुभूती नाही असा दावा तेव्हा फडणवीस व इतर नेते करीत होते. पण लोकसभेला दणकून मार पडल्यानंतर आता यांना उपरती झाली आहे. त्यामुळेच यावेळी भाजपमध्ये घाऊक प्रमाणात बाहेरून नेते आयात करणे दिसले नाही. अन्यथा, जे जे जिंकणारे असतील त्यांना आपल्याकडे ओढण्याचे त्यांचे धोरण होते. ते दुकान यावेळी बंद झाले. अजितदादांच्या पक्षाची मते लोकसभेला मिळाली नव्हती हे मात्र अजूनही देवेंद्र सांगतच आहेत. बारामतीतले भाजपचे कार्यकर्ते दादांचे काम करायला तयार नाहीत. दादांना घेतल्यामुळे शाह-मोदी यांचेही मन खाते आहे. पण त्याची थेट कबुली कशी देणार? त्याऐवजी दादांना सतत असुरक्षित ठेवणे अधिक सोईचे आहे.

विचार

ट्रम्पशाहीमुळे ट्रुडो जात्यात

कॅनडामध्ये खलिस्तानी अतिरेकी असल्याचे मान्य करताना भारताच्या भूमिकेवर टीका करण्याची दुटप्पी नीती कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी अंगिकारली. आता मात्र ट्रम्पशाही आल्यामुळे ते चिंतीत आहेत. कॅनडाची अर्थव्यवस्था संकटात असून प्रचंड बेरोजगारी आणि महागाईमुळे जनतेमध्ये असंतोष आहे. या मुद्द्यांवरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी भारतविरोधी मोहिमेला बळ देणाऱ्या ट्रुडोंची भाषा बदलली आहे.

प्रा.डॉ. विजयकुमार पोटे

अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाचे जगावर काय परिणाम होतील, याची चर्चा अजून थांबलेली नसतानाच ट्रम्प आणि त्यांच्या निवडणुकीतील पाठीराखे एलन मस्क यांनी केलेल्या वक्तव्याचे आता कॅनडात पडसाद उमटायला लागले आहेत. आतापर्यंत खलिस्तानी अतिरेक्यांना पाठीशी घालणाऱ्या आणि भारताविषयी सातत्याने फुत्कार करणारे कॅनडाच्या पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची भाषा दोनच दिवसांत बदलली आहे. अर्थात, भाषा बदलली, तरी मूळ स्वभाव थोडाच बदलतो? एकीकडे कॅनडामध्ये खलिस्तानी अतिरेकी असल्याचे मान्य करायचे आणि त्याच वेळी भारताच्या भूमिकेवर टीका करायची, ही दुटप्पी नीती झाली; परंतु असे असले, तरी ट्रम्प आणि मस्क यांच्या इशाऱ्यामुळे जस्टिन ट्रुडो आणि त्यांचे समर्थक चांगलेच चिंतीत आहेत. एक तर कॅनडाची अर्थव्यवस्था संकटात आहे. तिथे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. महागाईने कळस गाठला आहे. अशा परिस्थितीमध्ये देशांतर्गत प्रश्नांवरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी जस्टिन ट्रुडो भारतविरोधी मोहिमेला बळ देत होते. ट्रम्प यांच्या विजयामुळे जगभरातील अनेक देश आनंदी असतानाच अनेक देशांमध्ये तणाव स्पष्टपणे दिसून येत आहे. अमेरिकेच्या शेजारी देश कॅनडाम ध्येही असाच तणाव दिसून येत आहे. ट्रुडो इतके चिंतित आहेत, की त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाबद्दल चिंता दूर करण्यासाठी कॅनडा-अमेरिका संबंधांवर विशेष कॅबिनेट समितीची पुनर्स्थापना केली. कॅनडा लवकरच निवडणुकीला सामोरे जात आहे. या निवडणुकीत जस्टिन ट्रुडो यांचे काही खरे नाही, अशी चर्चा सुरू असतानाच मस्क यांनी आता जस्टिन ट्रुडो यांचीे अखेर आहे, असे वक्तव्य केल्याने कॅनडातील सत्ताधारी पक्ष आणखी चिंतेत पडला आहे.

कॅनडाने स्थापन केलेल्या विशेष मंत्रिमंडळ समितीचे अध्यक्षपद देशाच्या उपपंतप्रधान क्रिस्टिया फ्रीलँड यांना देण्यात आले आहे. त्या देशाच्या अर्थमंत्रीही आहेत. या समितीमध्ये परराष्ट्र व्यवहार, सार्वजनिक सुरक्षा आणि उद्योगमंत्र्यांसह इतर उच्चपदस्थ अधिकारीही असतील. ट्रम्प यांच्या विजयानंतर कॅबिनेट समिती कॅनडा-अमेरिकेच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करेल, असे ट्रुडो यांच्या कार्यालयाने सांगितले. कॅनडा हा जगातील व्यापारावर सर्वाधिक अवलंबून असलेला देश आहे. कॅनडाची ७५ टक्के निर्यात अमेरिकेमध्ये होते. ट्रम्प हे 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट'(नाफ्ता)वर फेरविचार करण्याच्या हालचाली आणि ऑटो सेक्टरवर २५ टक्के शुल्क लावण्याचा विचार करत असल्याच्या अहवालाने कॅनडाच्या सरकारच्या पोटात भीतीचा गोळा आला आहे. फ्रीलँड यांनी 'ट्रम्प आणि त्यांच्या टीमसोबत आमचे घट्ट नाते आहे. कॅनडा आणि अमेरिका यांच्यातील संबंध खूप चांगले आहेत,' असे सांगितले असले तरी ट्रम्प यांनी जस्टिन ट्रुडो यांना अनेकदा फटकारले आहे. कॅनडाने २०२३ मध्ये आपल्या लष्करी बजेटवर जीडीपीच्या १.३३ टक्के खर्च केला आहे. यासंदर्भात दोन टक्के रक्कम खर्च करण्याची गरज आहे. दररोज चार लाख कॅनेडियन जगातील सर्वात लांब आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडतात आणि सुमारे आठ लाख कॅनेडियन अमेरिकेत राहतात. ट्रम्प पुन्हा एकदा सत्तेवर आल्याने अनेक देशांची चिंता वाढली आहे. या यादीमध्ये कॅनडा पहिल्या क्रमांकावर आहे.

यापूर्वी खलिस्तान्यांच्या समर्थनार्थ बोलून कंटाळलेल्या ट्रुडो यांचा खलिस्तानी आणि इतर शीख वेगळे आहेत, यावर विश्वास बसत नव्हता. अलिकडे मात्र त्यांनी खुल्या व्यासपीठावर हे सत्य स्वीकारले. खलिस्तान समर्थक फुटीरतावादी संपूर्ण शीख समुदायाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, असे ते अलिकडेच म्हणाले. जस्टिन ट्रुडो यांनी ट्रम्प यांचे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केले आणि कॅनडा आणि अमेरिका यांच्यातील मैत्रीबद्दल बोलले; परंतु त्यांच्या मनातील चिंता कायम आहे. या दोन्ही नेत्यांमधील संबंध अनेकदा तणावाचे राहिले आहेत. दोघेही सार्वजनिक ठिकाणी एकमेकांवर चिखलफेक करत आहेत. दोन महिन्यांपूर्वी, सप्टेंबरमध्ये, ट्रम्प यांनी एका पुस्तकातून जस्टीन ट्रुडो यांच्याबद्दल अफवा पसरवल्या होत्या. त्यात ते क्युबाचे दिवंगत हुकूमशहा फिडेल कॅस्ट्रो यांचे पुत्र आहेत, असे म्हटले होते. जस्टिन ट्रुडो आणि उपपंतप्रधान क्रिस्टिया फ्रीलँड यांच्या विधानांवरून कॅनडाच्या गोंधळाचा सहज अंदाज लावला जाऊ शकतो. ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये परतल्याने त्यावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, अशी ग्वाही या दोघांनी दिली असली, तरी त्यात आत्म विश्वासाचा आणि खात्रीचा अभाव होता. अमेरिकेला खूश ठेवणे ही कॅनडाची मोठी मजबुरी आहे. आपल्या एकूण निर्यातीच्या अंदाजे ७५ टक्के निर्यात अमेरिकेला करत असल्याने त्या देशाशी पंगा घेण्याचा प्रयत्न केला, तर कॅनडा पूर्णपणे उद्ध्वस्त होऊ शकतो.

दुसरीकडे, खलिस्तानी दहशतवादी निज्जर याच्या हत्येमुळे भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडले होते. निज्जर यांच्या हत्येला भारत जबाबदार असल्याचा आरोप कॅनडाने सुरुवातीपासूनच केला आहे; मात्र भारत सरकारने सुरुवातीपासूनच कॅनडाचा हा आरोप निराधार असल्याचे म्हटले. ट्रम्प यांच्या धोरणाचा कॅनडाचे हवामान, व्यापार, सुरक्षा आणि इमिग्रेशन यावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली. उपपंतप्रधान फ्रीलँड यांनी पत्रकारांना सांगितले, की बरेच कॅनेडियन काळजीत आहेत आणि मी कॅनडियन लोकांना खात्रीने सांगू इच्छिते की, कॅनडा पूर्णपणे ठीक होईल. अमेरिकेसोबत आमचे मजबूत संबंध आहेत. ट्रम्प आणि त्यांच्या टीमसोबत आमचे घट्ट नाते आहे.

अर्थात त्यांच्या या वक्तव्यावर अमेरिकन अब्जाधीश मस्क यांनी लगेच पाणी फेरले. जस्टिन ट्रुडो या वेळी निवडणुकीत हरणार आहेत, असे ते म्हणाले. मस्क आणि ट्रम्प यांची भूमिका लक्षात घेता ट्रुडो यांच्यासाठी येणारे दिवस चांगले नाहीत, असा त्याचा अर्थ आहे. त्याच वेळी भारत आणि कॅनडामधील वाद इतका वाढला आहे की दोन्ही बाजूंच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना माघारी बोलावण्यात आले आहे. मस्क यांच्यासारख्या बलाढ्य व्यक्तीने ट्रुडोबद्दल असे काही बोलणे, हा एक धक्का आहे. आधी ट्विटर विकत घेऊन आणि आता ट्रम्प यांना अमेरिकेचे अध्यक्ष बनवून त्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. यामुळेच मस्क यांनी जस्टिन ट्रुडो यांच्या पराभवाची भविष्यवाणी केल्यापासून भारतात 'सोशल मीडिया'वर ट्रुडो यांची खिल्ली उडवली जात आहे; मात्र मस्क काय म्हणाले हा विनोदाचा विषय नाही.

जगभरातील सरकारे बनवण्यात आणि पाडण्यात शक्तिशाली देशांची खूप महत्त्वाची भूमिका असते. बांगलादेशमधील हसिना सरकार कसे पाडले गेले हे आपण अलीकडेच पाहिले. यामागे अमेरिकेचा हात होता हे सर्वांना माहीत आहे. कॅनडाची परिस्थिती बांगलादेशसारखी नसली, तरी फारशी चांगलीही नाही. ट्रुडो यांनी निज्जर हत्याकांडातून भारताशी वैर पत्करले. त्यामुळे भारताने कॅनडातील वाणिज्य दूतावास बंद केले. जगभरातील बलाढ्य देश अनेक देशांमध्ये आपल्या फायद्यासाठी सरकारे बनवत आहेत. पाकिस्तान, बांगलादेशसारखे छोटे आणि कमकुवत देश असोत किंवा कॅनडासारखे मोठे देश; मोठ्या देशांच्या प्रभावामुळेच येथे प्रमुख निवडून आले आहेत. कॅनडामध्ये जस्टिन ट्रुडो यांच्यावर आपले सरकार स्थापन करण्यासाठी चीनची मदत घेतल्याचा आरोप आहे. जस्टिन यांच्या विजयात चीनची भूमिका असल्याचा आरोप कॅनडातील विरोधक सातत्याने करत आहेत.

एवढेच नाही, तर ट्रुडो यांना कॅनडात निवडून आणण्यामागे चीनच्या भूमिकेबाबत एक चौकशी समितीही स्थापन करण्यात आली आहे. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांना शेजारी चीनसमर्थित कोणतीही व्यक्ती इतकी मजबूत रहावी, असे अमेरिकेला वाटणार नाही. मस्क आणि ट्रम्प ज्या प्रकारे कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो यांचा तिरस्कार करतात, त्यावरून दिसते की ट्रुडो पुन्हा सत्तेवर येणार नाहीत. ट्रम्प यांनी ट्रुडो यांना डाव्या विचारसरणीचे वेडे म्हणत त्यांची खिल्ली उडवली. कॅनडातील लोक आधीच ट्रुडो यांना कंटाळले आहेत. ते पंतप्रधानांवर खूप नाराज आहेत, याचे मुख्य कारण तेथील ढासळलेली अर्थव्यवस्था आहे.

कोरोना महामारीनंतर जगाची परिस्थिती बिकट झाली आहे. युक्रेनवर रशियाच्या हल्ल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंव्यतिरिक्त विजेचे दर गगनाला भिडले आहेत. घरांच्या किमती वाढल्या असून परवडणारे घर मिळणे कठीण झाले आहे. नोकऱ्यांसाठी रांगा वाढत आहेत. आठवडाभर चाललेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपाने कॅनडा अलिकडेच ठप्प झाला होता. कॅनडा ही जगातील नवव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. २०२२ मध्ये तिचा जीडीपी २.२ ट्रिलियन होता. कॅनडाचा विकास दर ०.५ टक्क्यांच्या खाली आहे. यावरून या देशाची सध्याची स्थिती काय असेल हे समजू शकते. मतदारांची नाराजी पाहून किमान चार मंत्र्यांनी पुढची निवडणूक लढवणार नसल्याचे म्हटले आहे. काही खासदारांनाही पराभवाच्या भीतीने निवडणूक लढवायची नाही. यावरून ट्रुडो यांची स्थिती लक्षात यायला हरकत नाही.

आजकाल

रेवडीच्या पोत्यावर तरलेली लोकशाही

सुरेश खोपडे

महायुती व महाविकास आघाडी यांचे निवडणूक जाहीरनामे हे रेवडी बनविण्याचे घावुक कारखाने का व कसे काय बनले?

निवडणुकीतील जाहीरनामे फारसे कुणी वाचत नाही व त्यावर कोणाचा भरोसा ही नसतो. तरीपण त्यातून त्या पक्षाचा व मतदारांचा दृष्टिकोन समजून येतो.

महायुती तर्फे २५ लाख रोजगार निर्माण करणार, १० लाख विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये विद्या वेतन देणार, जीवनावश्यक वस्तूचे दर नियंत्रित करणार असे आश्वासन दिले. महा विकास आघाडी कृषी धोरण नव्याने आखणार पाच महत्वाच्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार. यासारख्या काही मोजक्या योजना सोडल्यास बाकी सर्व रेवडी प्रमाणे फुकट देण्याच्या योजना आहेत. गरजू लोकांना आर्थिक मदत मिळाली पाहिजे या बद्दल दुमत नसावे. पण या अशा तुटपुंज्या मदतीने आपले दारिद्र्य कमी होणार नाही हे माहीत असूनही मतदार रेवडीला का भुलतात व राजकारणी पारधी अशा रेवडीचे जाळे का फेकतात ? रेवड्यांना फसलेल्या मतदारांना चार दोन वाईट शब्द बोलुन त्यांचे नैतिक अधपतन झाले असा सोपा निष्कर्ष काढून आपण आपले समाधान करून घेतो पण त्याचे कारण वरवरचे नाही. त्याचे उत्तर मानव उत्क्रांती मधे शोधावे लागेल असे ' फ्रेडरिक नीच्या ' नावाचा अभ्यासक सांगतो. चिंपांझी माकडा पासून साऊथ आफ्रिकेत उत्क्रांत झालेला आदिमानव हा टोळ्या टोळ्यांनी जगभर पसरला. भारताप्रमाणे तो जपान ,चीन या जवळच्या देशातही गेला. चीनमध्ये मावोच्या नेतृत्वाखाली क्रांती झाली व तेथील अभिजन वर्गाचे उच्चाटन करण्यात आले. जपानमध्ये देखील 'माजी क्रांती' घडवून आणली गेली. तेथील सामुराई जमातीने आपला उच्चत्वाचा दर्जा सोडून दिला. समानता आणली गेली. त्यानंतर चीन जपान हे महासत्ता बनले.

भारतामध्ये सुमारे आठ हजार वर्षांपूर्वी आर्य ब्राह्मण भारतात आले त्यांनी स्थानिक अनार्यांना जिंकून आपले गुलाम बनविले. पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाले. आम्हा गुलामांनी देशात आधुनिकता विज्ञानवाद आणणाऱ्या ब्रिटिशांना येथून हाकलून लावले पण परंपरागत प्रतिगामी विचाराच्या ब्राह्मणांच्या वर्चस्वाला हात लावला नाही. राज्यघटना आली तरी आम्ही सगळेजण गुलामगिरी मध्ये जगत आहोत. कसे ते मी अनेक वेळा माझ्या पोस्टम ध्ये लिहिलेले आहे. जपान चीन त्यांच्या तुलनेत भारत कोठे आहे? जागतिक हंगर इंडेक्स मध्ये १२७ देशांमध्ये भारताचा नंबर १०५वा लागतो. बांगलादेश नेपाळ यापेक्षा वाईट. जागतिक हॅपिनेस इंडेक्स म्हणजे सुखी समाधानी जगणे या मध्ये १४३ देशात भारताचा क्रमांक १२३ वा आहे. पाक, बांगला देश या पेक्षा वाईट. देशाचा जीडीपी दरडोई उत्पन्न, सुरक्षिततेची भावना, आयुर्मान व आरोग्य, भ्रष्टाचार,जगण्याचे स्वातंत्र्य, एकमेकांना मदत करण्याची प्रवृत्ती इत्यादी घटकावर अवलंबून असतो. ते घटक सुधारण्यासाठी कोणतीही उपाययोजना या दोन्ही जाहीरनाम्यामध्ये नाही. मानवी क्षमतेवर काम करणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांनी हे दाखवून दिलेले आहे की प्रत्येक माणसांमध्ये एक सुपरमॅन असतो त्याला जागृत केले पाहिजे व ते काम फक्त सत्ताधारी नेते सुसंगत व्यवस्था निर्माण करून बदलू शकतात. इथं मात्र या जाहीरनाम्याद्वारे मूठ मूठ रेवड्या फेकून प्रत्येक जण एक सामान्य दर्जाचा गुलाम प्रवृत्तीचा, ऐतखाऊ (,) माणूस बनविण्याचे काम चालू आहे. जगातील प्रत्येक संस्कृतीमधील मालक व गुलाम गुलाम यांची नैतिक मूल्य व जगण्याचा हेतू एक सारखा नसतो. मालक हा मालक असतो आणि तो स्वतःची नैतिक मूल्य आपल्या गरजेनुसार निर्माण करतो, वापरतो व बदलतो देखील. महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस हा मालक जमातीचा नेता आहे त्याचे राजकीय, धार्मिक व कौटुंबिक आयुष्य हे कोणत्याही गुलाम जमातीच्या नेत्यापेक्षा वेगळे असते. देवेंद्र फडणवीस यांचे प्रथम प्राधान्य हे मालक जमात म्हणून येनकेन प्रकारे आपले वर्ण श्रेष्ठत्व कायम राखणे हे असते.कांहीं अपवाद वगळता प्रत्येक ब्राह्मण हा पुरस्कृत उमेदवारालाच मत देतो. गुलाम जमातीच्या मतदाराची नैतिक निष्ठा तेव्हढी प्रखर नसते.आर्थिक प्रलोभन किंवा रेवडी या पेक्षा ब्राह्मणाला आपले श्रेष्ठत्व कायम राखणे हे नैतिक मूल्य महत्वाचे वाटते तर गुलामांना उपयुक्तता () म्हणजे फायदा काय या दृष्टीने कोणत्याही घटनेकडे व्यवहाराकडे पाहण्याची प्रेरणा त्याच्यामध्ये निर्माण झालेली असते. त्यामुळे फुकट प्रवास ,फुकट धान्य, लाडकी बहीण म्हणून मिळणारे पैसे याकडे पाहून लोक बदलतात.तर शाहू फुले आंबेडकर,यशवंत राव चव्हाण यांचा जप करणारे अजित दादा, ब्राह्मणांचे कसब हा ग्रंथ लिहून मोठी क्रांती करणारे ज्योतिबा यांचे नावावर राजकारण करणारे छगनराव भुजबळ, ज्यांच्या धर्माचा प्रचंड तिरस्कार केला जातो ते हसन मुश्रीफ मलक जमातीचे ब्राह्मण नेते फडणवीस यांच्या पालखीचे भोई बनले. त्यात कोणतीच नैतिकता नाही आहे ती उपयुक्तता,व्यक्तिगत फायदा.

प्रत्येक मानवी संस्कृती मध्ये या मालक जमातीने गुलामांना या अश्या मुटभर रेवड्यावर नामोहरन केलेले आहे. खूप पूर्वी वाचलेली एक बोध कथा आठवली,

जुलमी मालक वृत्तीच्या राजाविरुद्ध गुलामानी उठाव केला. क्रांती घडवून राजाला पदच्युत करून त्याला जेर बंद करण्याचा निर्धार केलां. गुलामांचा मोर्चा त्वेषाने राजवाड्याकडे निघाला. राजाच्या सैन्याने मोठे रणगाडे जमावाच्या दिशेने उभे केले. तोफ गोळे जमावावर डागले जातील असे वातावरण दिसत होते. तरीपण जमाव डगमगला नाही. मुर्दाबाद मुर्दाबाद म्हणत तो आगे कुच करत राहिला. मग तोफा धडाडल्या. कानठळ्या बसवणारे आवाज आले. आणि काय आश्चर्य ?तोफगोळ्यांच्या ऐवजी त्या तोफा मधून नोटा आणि नाण्यांचा वर्षाव सुरू झाला! गुलामांचा जमाव गोंधळाला. काय करावे ते सुचेना. राजवाड्याकडे चला राजवाड्याकडे चला असे त्यांचा नेता सांगत होता. पण लोक काय करत होते? ते आसपास पडलेली नाणी आणि नोटा जमा करण्यामध्ये गर्क राहिले. राजवाड्याकडे जायचे विसरले. जमेल तेवढा पैसा जमा करून ते आपल्या घराकडे परतले. ही बोध कथा असावी पण त्यात मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य दिसून येते. जगातील गुलामांना आत्मसन्मानाचे नैतिक मूल्य नसते. स्वतः जिवंत राहणे व पुढील पिढ्या जिवंत राहाव्यात यासाठी तरतूद करणे म्हणजे अस्तित्व टिकविणे हीच महत्त्वाची प्रेरणा असते. म्हणून ते फक्त आपला फायदा काय होईल हेच पाहत असतात. आपल्याला या दोन्ही आघाडीकडून आलेल्या रेवडीच्या निमंत्रणावरून हेच दिसून येते. सामान्य माणूस काय आणि कोट्यावधी मालमत्ता मिळवलेले पण गद्दार झालेले राजकीय नेते काय त्यांची मानसिकता एकच असते आणि म्हणून अनेक सुधारणावादी महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर पासून सगळे नेते गुलामांना आपल्या गुलामीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करीत होते. आज ते सगळं बंद पडले. इथले आर्य ब्राह्मण जे मालक जमात म्हणून राहतात त्यांना सुरुवातीला समता बंधुता देणारी राज्यघटना पाहून मोठा धक्का बसला होता. घटनाही नाकारली व तिरंगी ध्वजही नाकारला. पण त्यांच्या लक्षात आले की इथल्या गुलामांना नैतिकता देणाऱ्या राज्यघटने ऐवजी रेवडी महत्त्वाची वाटते म्हणून त्यांनी सगळी राज्यघटनाच रेवडीच्या पोत्यावर अलगत तरंगत ठेवली. त्याची जाणीव गुलामांना जेव्हा होईल तो सुदिन असेल!

मराठी साहित्यिक दिनविशेष

१५ नोव्हेंबर

१९०८ :- संपादक व समीक्षक विष्णू आंबेकर यांचा जन्म. मपराम र्श, तरंग आणि तुषार ही त्यांच्या समीक्षालेखांची संकलित पुस्तके, तर 'हरिभाऊ : काळ आणि कर्तृत्व' हा ग्रंथ त्यांनी संपादित केला होता. **१९३० :-** लेखक, समीक्षक आणि संतसाहित्याचे अभ्यासक निर्मलकुमार जिनदास फडकुले यांचा जन्म. २० स्वलिखित, तर ७ संपादित पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. 'साहित्यातील प्रकाशधारा', 'लोकहितवादी : काळ आणि कर्तृत्व', 'चिपळूणकरांचे तीन निबंध', 'चिंतनाच्या वाटा', 'संत चोखामेळा आणि इतर समकालीन संतांच्या रचना', 'संत तुकाराम : एक चिंतन' आदी पुस्तके महत्त्वाची आहेत. **१९३५ :-** ऐतिहासिक कागदपत्रकांचे संग्राहक व संशोधक सखाराम गणेश जोशी यांचे निधन. 'वंशावळी आणि बारीकसारीक ऐतिहासिक माहिती जी मिळेल ती गोळा करुन व्यवस्थितपणे टाचण करुन त्यांनी ठेवली. **१९४३ :-** लेखक, प्रवचनकार आणि रसायनशास्त्र या विषयातील एक तज्ञ प्रा. रघुनाथ सीताराम कडवे यांचा जन्म. राष्ट्रसंत तुकडोजी ग्रामगीतेचा हिंदी व इंग्रजीत अनुवाद करणाऱ्या कडवे यांनी गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, डॉ. आंबेडकरी, संत लटारे महाराज यांच्या चरित्रासह 'जनावरांचे शरीर पोषण' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. बालसाहित्यात भरीव कामगिरी केली. तसेच 'श्री गुरुदेव' या मासिकाचे संपादन केले. **१९४४ :** - लेखक मनोहर सोविंदाजी नगरकर यांचा जन्म. मनोहर भजनावली हा भजनसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९४९ :-** लेखक शिरीष अवधानी यांचा जन्म. नेपोलियन बोनापार्टच्या चरित्रासह 'स्वामी वैखरीचा' जी मिळल तो गाळा करुन व्यवस्थितपणे टाचण करुन त्यांनी ठेवली. **१९४३ :-** लेखक, प्रवचनकार आणि रसायनशास्त्र या विषयातील एक तज्ञ प्रा. रघुनाथ सीताराम कडवे यांचा जन्म. राष्ट्रसंत तुकडोजी ग्रामगीतेचा हिंदी व इंग्रजीत अनुवाद करणाऱ्या कडवे यांनी गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, डॉ. आंबेडकरी, संत लटारे महाराज यांच्या चरित्रासह मजनावरांचे शरीर पोषणफ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. बालसाहित्यात भरीव कामगिरी केली. तसेच 'श्री गुरुदेव' या मासिकाचे संपादन केले. **१९४४ :-** लेखक मनोहर सोविंदाजी नगरकर यांचा जन्म. ममनोहर भजनावलीफ हा भजनसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९४९ :-** लेखक शिरीष अवधानी यांचा जन्म 'नेपोलियन बोनापार्टच्या चरित्रासह 'स्वामी वैखरीचा' हे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे तर 'सोनियाचा पिंपळ' हे सोनांपत दांडेकर यांचे चरित्र. तसेच 'सीतेच्या तिरावर पॅरिस' हे प्रवासवर्णन. 'माझे जीवन गाणे' हे स्वतःचे आत्मचरित्र मिळून १०, १० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९७६:-** कथाकार व आकाशवाणीचे श्रुतिकाकार, तसेच 'माणूस' या टोपणनावाने वृत्तपत्रीय लेखन करणारे अंबादास शंकर अग्निहोत्री यांचे निधन. 'मुक्ता आणि इतर कथा', 'घुंगरु' हे त्यांचे कथासंग्रह.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

लोकसंसद

भाज्यांचे दर केव्हा उतरतील?

एकीकडे राज्यभर निवडणुकीच्या प्रचाराचा ज्वर वाढत चालला असताना दुसरीकडे भाज्यांच्या दरही भरमसाठ वाढत चालला असून याचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसत आहे. गेले काही दिवस घाऊक बाजारातील भाज्यांच्या किमतींनी गगनभरारी घेतल्याने किरकोळ बाजारातील भाज्यांचे दरही गगनाला भिडत आहेत. ६० रुपये किलोला मिळणारी वांगी १०

दादर पुलावरील गटाराचे काम संथ गतीने

- कामावरती फक्त दोनच मजूर
- वाहतूक कोंडीने चालक त्रस्त

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन बाजारपेठेतील दादर पुलाजवळ भवानी स्वीट मार्टच्या समोर अंदाजे वीस मीटर लांबीच्या गटाराचे काम सुरू करण्यात आलेले आहे. पूर्वी या ठिकाणी दगडी पिचिंगचे बांधकाम केलेले होते, ते अत्यंत जुने झालेले असल्यामुळे अनेक ठिकाणी कोसळत होते. त्यामुळे नगरपरिषदेने सदरचे गटार आरसीसी बांधण्याचा निर्णय घेतला व त्यासंबंधित कामाची जाहीर निविदा काढून संबंधित ठेकेदाराला काम करण्यासाठी वर्क ऑर्डरदेखील देण्यात आलेली आहे.

ज्या ठिकाणी गटाराचे काम सुरू आहे, तो रस्ता अत्यंत रहदारीचा असून, सकाळ, दुपार, संध्याकाळ त्या ठिकाणी वाहनांच्या रांगाच रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. गटार खोदलेले असल्यामुळे गटारातील काढलेला मलबा, दगड, त्याचप्रमाणे माती रस्त्यावर एका बाजूला रचून ठेवल्यामुळे सदर परिसरामध्ये रस्ता अत्यंत अरुंद असा शिल्लक राहिलेला आहे. त्यातच नेहमीप्रमाणे श्रीवर्धन बाजारपेठेत वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या करणाऱ्या दुचाकीस्वारांमुळे सदर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. संबंधित ठेकेदाराने कामावरती केवळ दोनच मजुरांची नियुक्ती केली आहे. जर त्या ठिकाणी जास्त मजूर लावून हे काम लवकरात लवकर आटोपले असते, तर नागरिकांनादेखील सोयीचे झाले असते. तरी नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर ठेकेदाराला सूचना देऊन कामावरती जास्त मजूर लावून काम दोन दिवसांमध्ये समाप्त करून घ्यावे, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ नोव्हेंबर
१) श्रीम. शुभांगी कमलाकर किल्लेकर
अलिबाग, १६-११-१९४९

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

मौजे :- बेलोंडाखार ता:-उरण, जि:- रायगड

सर्व्हे नं	शेतकऱ्यांचे नांव	एकूण क्षेत्र हे. आर.	आकार रू. पैसे
१८/१०	संतोष तुकाराम वाढवणे श्रीराम दादासाहेब केदार	०.०४.००	२.०६

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- १५/११/२०२४
ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिपक टिकम वासवाणी यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर. (आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)	विद्यमान मालक
मुशेत ता. अलिबाग	३०/२	क्षेत्र ०-९४-६० पो.ख. ०-३९-५० एकूण क्षेत्र १-३४-१०	१७.३८	श्री. दिपक टिकम वासवाणी

या मिळकतीपैकी श्री. दिपक टिकम वासवाणी यांच्या मालकीचे क्षेत्र ०-४७-८० हे. आर., पो.ख. ०-१२-२० हे. आर. एकूण क्षेत्र ०-६०-०० हे. आर., आकार ३.७७ रु पैसे या क्षेत्रासंबधीत.

या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार विक्रेते यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : १५/११/२०२४

(ॲड. सागर विजय पाटील)
पत्ता : मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी.
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९९२२५६७८९१

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिल श्री. धिरेंद्र जाधवजी काराणी, रा. चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग याचे मालकीची वाणिज्य गाळा मिळकत जी मौजे चेंढरे-अलिबाग येथील तळमजल्यावरील वाणिज्य गाळा मिळकत क्र.२ व क्र. ३, एकूण क्षेत्र १४४ चौ. मीटर बिल्टअप, श्रीबाग क्षेत्र विकास योजना नं.२, स.नं.१००, १०१ अशी आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे यापुर्वीचे नोंदणीकृत दस्त दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील १) दस्त क्र.६५९/१९८४, २) दस्त क्र. २७९२/१९९०, ३) दस्त क्र. २०६७/१९९५ हे मूळ दस्त आमचे अशिलांच्या त्यांचे मौजे चेंढरे येथील घरामध्ये फर्निचरचे काम सुरु असताना गहाळ झाले आहेत. याबाबत आमचे अशिलाने पोलिस स्टेशन अलिबाग येथे करारनामा गहाळ झाल्याबाबत नोंद केलेली आहे. सदरची नोंद अलिबाग पोलिस ठाण्यामध्ये प्रॉपर्टी मिसींग रजिस्टर्ड नं. ०९४२/२०२४ अन्वये दाखल आहे व तसा दाखला आमचे अशिलास पोलिस स्टेशन अलिबाग यांनी दि.१४.११.२०२४ रोजी दिला आहे.

तरी वर वर्णन केलेला आमच्या अशिलाचा मालकीचा वाणिज्य गाळा तारण ठेवून आमचे अशिल सारस्वत को.ऑ.बँक लि.शाखा अलिबाग यांजकडून कर्ज घेत आहेत व त्याकरीता सदरहू गाळ्याचे टायटल सर्टिफिकेट आमचे अशिलांस देण्याचे आहे. तरी याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१६.११.२०२४

मिलिंद चव्हाण
ॲडव्होकेट
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३,अलिबाग

तुळशीच्या लग्नाचे साहित्य विक्रीला

तळा : बाजारपेठेत तुळशी लग्नासाठी लागणारे साहित्य दाखल झाले असून, तालुक्यात सर्वत्र तुळशी विवाहाची लगबग सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तुळशी विवाहाला प्रारंभ झाल्याने बाजारपेठही साहित्याने नटली आहे. नागरिकांची खरेदीसाठी झुंबड उडत आहे. तुळसीचे लग्न हा पूजोत्सव आहे. त्यात तुळस ही वधू, बाळकृष्ण हा वर, तर ऊस हा मामा समजला जातो. या सोहळ्यासाठी घराघरात लगबग पाहायला मिळत आहे. या विवाह सोहळ्यासाठी नागरिकांनी तुळशी वृंदावन सारवून, स्वच्छ करून सुशोभित करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे बाजारपेठेत ऊस, आवळे, चिंचा विक्रीसाठी पाहायला मिळत आहेत.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती (सदर मिळकती) या मे. पुष्पम इन्फ्रा एल.एल.पी., पत्ता: ६३५/१ब न्यू गजरा सोसायटी, बिबवेवाडी, पुणे ४११०३०, यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीच्या असून त्या निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याचा भरवंसा त्यांनी आमचे अशिलांस देऊन सदर मिळकती आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे त्यांनी मान्य व कबूल केलेले आहे. तरी सदर मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत समक्ष भेटून आमची कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक, हितसंबंध, अधिकार अगर बोजा नाही व असल्यास, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे,

परिशिष्ट : तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका अलिबाग व मे दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे स्थलसीमेतील तसेच जिल्हा परिषद अलिबाग-रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग, ग्रुपग्रामपंचायत धोकवडे हद्दीतील गाव मौजे धोकवडे येथील गट नंबर ६८४, ६९२, ६९३, ६९४, ६९५ व ६९६/१ चे मंजूर रेखांकनापैकी खालील वर्णनाच्या बिनशेती प्लॉट मिळकती:

प्लॉट नंबर	यांसी सुसंगत गट नंबर	क्षेत्र (चौ.मी.)	चतुःसीमा			
			पूर्वेस वा त्याबाजूस	दक्षिणेस वा त्याबाजूस	पश्चिमेस वा त्याबाजूस	उत्तरेस वा त्याबाजूस
१	६८४/२	५११	प्लॉट नं.३	गट नं. ६९६/२	गट नं. ७००	अंतर्गत रस्ता
२	६८४/३	५११	अंतर्गत रस्ता	गट नं. ६९६/२	प्लॉट नं.२	अंतर्गत रस्ता
३	६८४/४	५११	प्लॉट नं.५	अंतर्गत रस्ता	अंतर्गत रस्ता	गट नं. ६४६
४	६८४/५	५११	प्लॉट नं. ६	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.४	गट नं. ६४६
५	६८४/६	५११	गट नं. ६४६	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.५	गट नं. ६४६
६	६८४/७	४९८	प्लॉट नं.८	प्लॉट नं. १०	अंतर्गत रस्ता	अंतर्गत रस्ता
७	६८४/८	५११	प्लॉट नं.९	प्लॉट नं. ११	प्लॉट नं.७	अंतर्गत रस्ता
८	६८४/९	५११	ओपन स्पेस-१	प्लॉट नं. १२	प्लॉट नं.८	अंतर्गत रस्ता
९	६८४/१०	४९७	प्लॉट नं.८ व ११चे भाग	अंतर्गत रस्ता	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.७
१०	६८४/११	५११	प्लॉट नं.१२	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. १० व अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.८
११	६८४/१२	५०९	ओपन स्पेस-१	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. ११	प्लॉट नं.९
१२	६८४/१३	५०८	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. १४	गट नं. ६९६/२	अंतर्गत रस्ता व अनबिल्डेबल क्षेत्र-२
१३	६८४/१४	५०६	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. १५	गट नं. ६९६/२	प्लॉट नं. १३
१४	६८४/१५	५२६	प्लॉट नं. १६ व गट नं. ६९०	गट नं. ६९०	गट नं. ६९१	प्लॉट नं.१४(भाग)व अंतर्गत रस्ता
१५	६८४/१६	४८४	अमेनिटी स्पेस नं.२	गट नं. ६९०	अंतर्गत रस्ता व प्लॉट नं. १५ (भाग)	अंतर्गत रस्ता
१६	६८४/१७	५०५	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. १८	ओपन स्पेस-१	गट नं. ६४६
१७	६८४/१८	४७९	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. १९	ओपन स्पेस-१	प्लॉट नं. १७
१८	६८४/१९	४७१	अंतर्गत रस्ता	अंतर्गत रस्ता	ओपन स्पेस-१	प्लॉट नं. १८
१९	६८४/२०	५०३	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.२१	ओपन स्पेस-२	अंतर्गत रस्ता
२०	६८४/२१	४७७	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं.२२	ओपन स्पेस २	प्लॉट नं.२०
२१	६८४/२२	४७८	अंतर्गत रस्ता व गट नं.६८३	गट नं. ६८९	ओपन स्पेस-२	प्लॉट नं. २१
२२	६८४/२३	४५९	गट नं. ६७९	प्लॉट नं. २४	अंतर्गत रस्ता	अंतर्गत रस्ता व गट नं. ६४७
२३	६८४/२४	४६६	गट नं. ६७९	गट नं. ६७९	अंतर्गत रस्ता	प्लॉट नं. २३

येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक मिळकती त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, जल, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप वगैरे सर्व तद्गभूत वस्तूंसहीत, तसेच मंजूर लेआऊट मधील जाण्यायेण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याच्या व इतर तद्अनुषंगिक सर्वांसह दरोबस्त मिळकती काही एक राखून न ठेवता,

दि. १५.११.२०२४

सही/-
नवनीत मुथा, ॲडव्होकेट
८. जय अपार्टमेंट्स, १०९८/१४,
मॉडल कॉलनी, पोस्टऑफीस जवळ,
शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक स्वाती संतोष म्हात्रे, उमेश जयवंत म्हात्रे, प्रकाश गजानन पोवळे, संतोष अनंत म्हात्रे यांनी कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर. (आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)	विद्यमान मालक
मुशेत ता. अलिबाग	३०/२	क्षेत्र ०-९४-६० पो.ख. ०-३९-५० एकूण क्षेत्र १-३४-१०	१७.३८	स्वाती संतोष म्हात्रे, उमेश जयवंत म्हात्रे प्रकाश गजानन पोवळे संतोष अनंत म्हात्रे

या मिळकतीपैकी श्री. दिपक टिकम वासवाणी यांच्या मालकीचे क्षेत्र ०-४६-८० हे. आर., पो.ख. ०-२७-३० हे. आर. एकूण क्षेत्र ०-७४-१० हे. आर., आकार १३.६१ रु पैसे या क्षेत्रासंबधीत.

या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार विक्रेते यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : १५/११/२०२४

(ॲड. सागर विजय पाटील)
पत्ता : मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी.
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ९९२२५६७८९१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. संदिप अनंत भोईर व श्री. समीर यशवंत साळोखे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

मौजे बिड बु., ता. कर्जत, जि. रायगड येथील

स.नं.	हि. नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
७	२	०-१५-९०	२-८१

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १६/११/२०२४

मो. ०९३२६२३६९२३
मो. ०९६८९६९९५९५

ॲड. प्रवीण शांताराम खडे
पत्ता:-२, 'लक्ष्मी सदन'
जुने एस.टी. स्टॅण्ड,
मु. पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that we are, on behalf of our client, investigating the right, title and interest of Mrs. Sarojini Rahul Narwekar, who has informed us that she is the absolute owner of the land parcels which are more particularly described in the SCHEDULE written hereunder ("Property") and the same is free from all encumbrances of any nature whatsoever.

All and any person/s having any right, claim, demand, share, estate, benefit or interest to or in respect in the Property or any part thereof or any FSI or development potential thereof, whether by way of inheritance, sale, transfer, conveyance, share, mortgage, charge, loans, advances, release, relinquishment, lease, leave and license, care-taker basis, lien, devise, assignment, tenancy, gift, exchange, encumbrance, family arrangement/settlement, settlement of debt, will, bequest, succession, maintenance, easement, trust, possession, occupation, decree, order or award of any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration, contracts/ agreements/ sale deeds, conveyance, deeds, memorandum of understandings, letter of intent/term sheet/heads of terms, development rights, partnership, right of way, lis pendens, reservation, power of attorney, option, right of first refusal, pre-emption or any liability or any commitment or otherwise of whatsoever nature, is/are hereby required to make the same known to us, in writing, at the address set out hereinbelow, within a period of 14 (fourteen) days from the date of publication hereof together with copies of all documents on the basis of which such claims, demands or rights are being made or agitated, failing which all such rights, claims, demands, shares, estates, benefits and/or interests shall be deemed to have been waived and shall not be binding on our client, who shall proceed to acquire with the Property without any reference/regard to the same.

SCHEDULE AS REFERRED TO HEREIN ABOVE
(Description of "Property")

All that piece and parcel of land bearing Gat No. 379/2 (bearing old Gat No. 519/(B)/2) admeasuring 84-20 Ares-square meters, Gat No. 380 (part) (bearing old Gat No. 520) admeasuring 43-10 Ares-square meters, and Gat No 383/2 (bearing old Gat No. 524/(B)/2) part admeasuring 63 Ares situate at Village Zirad Taluka Alibag, District Raigad and land bearing Gat No. 312 admeasuring 35 Ares situate at Village Satirje, Taluka Alibag, District Raigad, Maharashtra.

Dated 16th day of November 2024

Ms. Anuja Kedia
Senior Partner
Messrs. Parinam Law Associates
4th floor, Express Towers,
Ramnath Goenka Marg,
Nariman Point, Mumbai – 400 021.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२

क्रं. अपिल/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/४३४/२०२४ दिनांक :- १३.११.२०२४

जाहीर सूचना

प्रति,
१. श्रीमती अंकिता अशोक हुमणे
रा. मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
२. श्रीमती दिपाली दिलीप मांडवकर
रा. मु. पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड
३. श्री. प्रकाश बाळाकृष्ण भालकर
रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड
४. श्रीमती राजेश्री राजेश गोविलकर
रा. मु. बांधण, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड
५. श्रीमती शुभांगी संतोष पाडावे
रा. मु. रामवाडी, पो. ता. पेण, जि. रायगड
६. श्रीमती संजना संतोष कळंबटे
रा. मु. मेटपाडा, अलिबाग बाजारपेठ, ... अर्जदार
पो. ता. अलिबाग, जि. रायगड

विरूद्ध

१. श्रीमती सुगंधा किसन जावळे
रा. बैठक हॉल जवळ, कुंभार आळी,
ता. पेण, जि. रायगड
२. श्रीमती वासंती नारायण सरवणकर
रा. मु. बोरी, पावघाट-उरण, ता. उरण, जि. रायगड
३. श्रीमती सुवर्णा सुधाकर चापडे
४. श्री. अशोक रघुनाथ भालकर
५. श्रीमती अपर्णा अरुण भालकर
६. श्री. सौरभ अरुण भालकर
७. श्रीमती निकीता नरेश चौगुले
क्रं. ३ ते ७ रा बांधण. पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड
८. तलाठी सजा बेलवली, श्री. मंगेश बाळे झगुळकर
रा. अलिबाग, जि. रायगड
९. मंडळ अधिकारी किहिम, श्री. सुरेश वसंत पाटील ... सामनेवाले
रा. अलिबाग, जि. रायगड

विषय:- मा. अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद/अपील/क्र. ३३१/२०२२ दि. ०८/०४/२०२४ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज.

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल/फेरचौकशी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २६.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अधिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास अपिल/फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
(वैभव गुहागरकर)
नायब तहसिलदार (अपिले)
अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की. आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सुनिता शर्मा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे- शिंगढोळ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

भूमापन क्र. व उपविभाग /सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर. पॉ)	आकार (रु.पै.)
५५/१	एकुण क्षेत्र ०-२३-३० हे आर पॉ	५-३१

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १६/११/२०२४ **ॲड. निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. धावजी परशुराम पाटील यांनी खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत त्याचे मालक १) श्री. पुष्कर नंदकुमार ढवळे, २) श्री. योगेश सुरेश देवस्थळी, ३) श्री. ओमकार प्रभाकर आठल्ये यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन :-

जिल्हा व तुकडी ठाणे व पोटतुकडी व तालुका कर्जत, मा. दुय्यम निबंधक, कर्जत यांचे क्षेत्राधिकारातील मौजे - नांदगाव, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील शेतजमीन मिळकत

गावाचे नाव	सर्वे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे आर-पॉ.	आकार रुपये- पैसे
नांदगाव

षटकार मारणार तोही व्याजासह

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

चौकार मारणार, चौकार मारणार असे या निवडणुकीत सातत्याने सांगितले जात आहे. मी यावेळी षटकार मारणार आणि तोही व्याजासह मारणार, असा इशारा स्नेहल जगताप यांनी आ. गोगावले यांना दिला आहे.

महाड आणि पोलादपूर विधानसेभेच्या महाविकास आघाडीतील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ पोलादपूर येथे गुरूवारी (दि.१४) डॉ. नितीन बानगुडे पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

सभेदरम्यान स्नेहल जगताप म्हणाल्या की, विरोधकांनी मला कमी लेखू नका. माझ्यामुळेच गोगावले कुटूंबाला रस्त्यावर उतरून प्रचार करावा लागत आहे, यातच माझा विजय आहे. येणाऱ्या २३

स्नेहल जगताप यांचा आ. गोगावलेंना इशारा

नोव्हेंबरला गुलाल माझाच असणार आहे. तसेच, तुम्ही विकास केल्याचे सांगत आहात, मग गावागावात फिरताना विकास करण्यासाठी मला एक संधी द्या, असे का सांगावे लागत आहे. औद्योगिक वसाहतीमधील थर्ड पार्टीमधील तरुणांच्या पगाराच्या कमिशनवर तुमचा धंदा चालत आहे तो मोडीत काढणार. या मतदार संघात १५ वर्षे नवीन कारखाने आले ना दर्जेदार शिक्षण संस्था आली. तसेच, आरोग्याचा प्रश्नही सुटलेला नाही. मग तुम्ही काय विकास केलात, असा सवाल स्नेहल जगताप यांनी आ. गोगावले यांना केला आहे.

डॉ. नितीन बानगुडे पाटील यांनी राज्यसरकारचा जोरदार समाचार घेताना मतदारसंघातील अनेक राजिप शाळा बंद चुकीच्या लोकांच्या हातात सत्ता दिल्याने पडत असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच, येथील अध्यक्ष शिवनेरी बसमध्ये शिवकन्या आणणार आहेत अशी योजना जाहीर करत आहेत. परंतु, ते फक्त जाहिरात बाजी करत असल्याची टिका त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी मशाल चिन्हासमोरील बटन दाबून स्नेहल जगताप यांना निवडून देण्याचे आवाहन देखील डॉ.बानुगडे पाटील यांनी केले.

यावेळी रायगड दक्षिण जिल्हा संपर्कप्रमुख नागेंद्र राठोड, जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, सहसंपर्कप्रमुख बाळकृष्ण राऊळ, माजी सभापती दिलीप भागवत, माजी जिप सदस्य अनिल नलावडे व मुरलीधर दरेकर तसेच अपर्णा जाधव, माजी नगराध्यक्ष निलेश सुतार, महमद मुजावर, काँग्रेस अध्यक्ष बाळाराम मोरे, शेकापक्ष चिटणीस वैभव चांदे, डॉ.स्विटी गिरासे, अमोल भुवड, अमरदीप नगरकर, स्वप्निल भुवड, पोलादपूर तालुका प्रमुख अनिल मालुसरे व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रीतम म्हात्रे यांना विजयी करा : ममता म्हात्रे

। चिरनेर । प्रतिनिधी ।

शेकापने नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून विकासात्मक दृष्टिकोन ठेवला आहे. या उरण मतदार संघातील शेकाप कार्यकर्त्यांच्या निष्ठेने शेतकरी कामगार पक्षाचे अस्तित्व टिकून आहे. त्यामुळे या निवडणुकीत शेकापची ताकद दाखवून शेकापक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन ममता म्हात्रे यांनी केले आहे.

शेकापक्षाचे उरण तालुका सहचिटणीस सुरेश पाटील यांच्या चिरनेर येथील निवासस्थानी मंगळवारी (दि.१२) शेकापच्या कार्यकर्त्यांची निवडणुकीच्या नियोजनासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या.

ममता म्हात्रे यांनी म्हटले, सध्याचे घाणेरडे राजकारण पाहता आपल्याला आपला पक्ष अधिक मजबूत करण्याच्या इराद्याने काम करून ही निवडणूक पूर्ण ताकतीनिशी लढवून, प्रीतम म्हात्रे यांना विजयी करायचे आहे. असे आवाहन करूत त्यांनी प्रमुख कार्यकर्त्यांवर नियोजनाची जबाबदारही टाकली आहे. यावेळी शुभांगी पाटील, संध्या पाटील, पार्वती कातकरी, अक्षता खारपाटील, शेकापचे उरण तालुका सहचिटणीस सुरेश पाटील, प्रफुल्ल खारपाटील, अरुण पाटील, दीपक कातकरी, नितीन म्हात्रे, अनिल पवार, अरुण शिंदे, प्रशांत खारपाटील, वसंत म्हात्रे, अनंत नारंगीकर, वैभव मोकल, शकुंतला पाटील, शोभा पाटील, भारती मोकल, रवीना मुंबईकर, अमित मुंबईकर तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

। उरण । प्रतिनिधी ।

उरणच्या विद्यमान आमदारांनी गेल्या पाच वर्षात तालुक्याच्या प्रश्नांकडे लक्ष न देता आमदारकीचा वापर केवळ स्वतःची तिजोरी भरण्यासाठीच केल्याने येथील जनता त्यांच्यावर नाराज आहे. अशा बिनकामी आमदाराला घरी बसवून तालुक्याचा विकास साधण्साठी अवघी तरूणाई प्रीतम म्हात्रे यांच्या मागे एकवटली आहे.

उरण विधानसभा मतदार संघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी प्रचार रॅलीच्या निमीत्ताने पागोटे, वेश्वी, दादरपाडा, फुडे, वोकबविरा, करंजा, नवाशेवा गावाचा झंजावाती दौरा केला. या दौऱ्यात प्रीतम म्हात्रे यांनी स्वतःला प्रचाराच्या कामात झोकून दिल्यामुळे तरूणाई त्यांच्यापाठीशी असून प्रचारात वेगळीच रंगत आणली असून शेकापची हवा निर्माण झाली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे . अकाऊंटंट (पेमेंट - १२०००) हाऊस कीपर (पेमेंट- ९५००) रिसेप्शन (पेमेंट - १२०००) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- भारतगैस वितरक मे.जे.बी.जगे ॲण्ड सन्स्, अलिबाग फुलटाईम/पार्ट टाईम कामासाठी मुले पाहिजेत संपर्क - ९३५९८८५६७६
- गाळा भाड्याने देणे आहे. पी.एन.पी.मध्ये कलावती भाजी भंडारच्या बाजूला, अलिबाग संपर्क : ७३०४८५२३१५/९६०४१३८८२६
- सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३
- इलेक्ट्रिशन पाहिजे, २ ते ३ वर्षाचा अनुभव. ८८८८६०५२५९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

नागांव

अलिबाग

आंदोशी

भोईघर

फोफेरी

चिखली

कोकबन

मजगाव

मल्याण

आक्षी

मांडला

सहाण

थळ

● वयोवृध्द मतदारांसाठी निवडणूक विभागाने गृहमतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार अलिबाग विधानसभा क्षेत्रामध्ये अलिबाग शहरातील सखाराम पवार (९३) आणि त्यांच्या पत्नी सुनंदा पवार (८८) यांनी गृहमतदानाचा हक्क बजावला.

बेलोशी

● चौक येथील दत्तात्रेय दबके (९०) यांनी आपल्या घरी गृहमतदानाचा हक्क बजावला.

● गोंधळपाडा येथील रा.जि.प. शाळेत गुरूवारी (दि.१४) बालदिन साजरा करण्यात आला. यावेळी सर्व मुलांना चॉकलेट देऊन तसेच फुगे लावून विविध मनोरंजनात्मक खेळ घेऊन दिवस आनंदाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक हजर होते.

बालांगण

कोण करतं पोटाचं रक्षण?

आपण जे अन्न खातो ते आपल्या पोटात जातं. पोटातले विविध अवयव अन्नावर प्रक्रिया करतात. अन्नातले नको असलेले घटक बाजूला काढतात आणि गरजेचे पोषक घटक रक्तात मिसळतात. रक्ताच्या माध्यमातून हे पोषक घटक शरीरातल्या पेशींना मिळतात. या पेशींच्या माध्यमातून आपल्याला ऊर्जा मिळते. अन्नाचं पचन पोटात होतं. खेळण्यासाठी अभ्यास करण्यासाठी जी ऊर्जा लागते ती अन्नाद्वारे मिळते.

आता अन्नाचं विभाजन कसं होतं हे आपण पाहू. आपल्या पोटाच्या बाहेरच्या भागात काही ग्रंथी असतात. या ग्रंथी गॅस्ट्रीक ज्यूस या द्रव पदार्थाची निर्मिती करतात. या रसाचा कोणताही रंग नसतो.



यात पेप्सिन आणि रेनिन नावाचे दोन घटक असतात. या घटकांमुळे अन्नाचं विभाजन होतं. गॅस्ट्रिक ज्यूसमध्ये आम्लाचं प्रमाण प्रचंड असतं. अन्नाचं पचन होण्यासाठी ही आम्लं गरजेची असतात. या आम्लात प्रचंड क्षमता असते. हे आम्ल धातूही वितळवू शकतं. या आम्लाच्या संपर्कात आलेली प्रत्येक गोष्ट वितळून जाते. प्रत्येक माणसाच्या पोटात हे आम्ल असतं. पण यामुळे पोट काही वितळत नाही, असं का बरं होत असावं? याचं कारण म्हणजे आपल्या नाकातून बाहेर पडणारा द्रव. हा द्रव पदार्थ पोट आणि नाकात असतो. या द्रवामुळे आपल्या त्वचेच्या आतल्या बाजूला संरक्षण मिळतं. या पांढऱ्या पेशी असतात. यामुळे आपल्या शरीराचं विविध रोगांपासून संरक्षण होतं. या द्रवाच्या आवरणामुळे घातक आम्लांपासून पोटाचं रक्षण होतं. आहे ना गंमत?

असं का?

असा आहे ब्रुनेई

'ब्रुनेई' हा दक्षिण-पूर्व आशियातला देश आहे. 'ब्रुनेई'च्या उत्तरेला दक्षिण चीनी समुद्र आणि उत्तरपूर्वेला 'फिलिपाईन्स' आहे. 'बंदर सेरी बेगावान' ही या देशाची राजधानी. आकाराने खूप लहान असलेल्या या देशात फार लोक राहात नाहीत. तिथला सुलतान हा ब्रुनेईचा प्रमुख. या देशात खनिज तेलाचे खूप साठे आहेत. त्यावर मालकी असल्याने या सुलतानाची गणना जगातल्या सर्वात श्रीमंत लोकांमध्ये होते. इस्लाम हा इथला प्रमुख धर्म असला तरी बौद्ध धर्माचे अनुयायीही इथे आहेत. 'मलाय' ही या देशाची प्रमुख भाषा असून इंग्रजीला दुसरा भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. चीनी भाषा बोलणारे बरेच लोक इथे आहेत.

१०० वर्षांपेक्षा जास्त काळ इथे ब्रिटिशांचं राज्य होतं. एक जानेवारी १९८४ ला त्यांना स्वातंत्र्य मिळालं. त्यानंतर या देशावर तिथल्या सुलतानाची सत्ता आहे. 'ब्रुनेयन डॉलर' हे इथलं चलन. दक्षिण-पूर्व आशियातला सर्वाधिक तेलाचं उत्पादन घेणारा तिसऱ्या क्रमांकाचा देश असल्याने या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जोरावर 'ब्रुनेई' ने बरीच प्रगती केली. नैसर्गिक वायू आणि लाकूडही इथे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. भात, भाज्या, फळं इथे पिकवली जातात. कुक्कुटपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. विविध प्रकारची उपकरणं, वाहतुकीसाठी लागणाऱ्या वस्तू, रसायनं, अन्नपदार्थ यांची आयात केली जाते.

सफर देशांची

शेतजमीन विकसित करण्यासाठी इथली जंगलं मोठ्या प्रमाणावर तोडली गेली. त्यामुळे वनसंपदा वाचवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. 'ब्रुनेई'मध्ये भरपूर पाऊस पडत असला तरी इथलं तापमान सर्वसाधारणपणे उष्ण असतं. या देशाला १६१ किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे.

क्रिडा साहित्याचे बदलते रंग

छोट्यांनो, आपल्याला विविध खेळ माहीत आहेत. खेळाडूंनी केलेले विक्रम, त्यांचे रँकिंग, आकडेवारी याची चर्चा होत असते. पण खेळताना वापरण्यात येणाऱ्या साहित्याची आपल्याला कल्पना नसते. दुखापती होऊ नये म्हणून क्रिकेटपटू हेल्मेट, ग्लोव्हज, पॅड्स घालतात. पायांना संरक्षण देण्यासाठी विविध खेळांमध्ये 'शिन गार्ड' वापरलं जातं. या शिन गार्डचा शोध कधी बरं लागला असावा? हजारो वर्षांपूर्वीही लोक शिन गार्ड वापरायचे. प्राचीन काळात ग्रीक आणि रोमन लोक युद्ध करताना शिन गार्ड घालायचे. हे शिन कार्ड पितळ्याचं असायचं. पण एकोणीसाव्या शतकापासून खेळाडू पायाला संरक्षण देण्यासाठी शिन गार्डचा वापर करू लागले आणि अनेकांचं हे महत्त्वाचं आयुध बनलं.

गोल्फ खेळताना वापरला जाणारा बॉल पूर्वीच्या काळात लेदर आणि पिसांपासून तयार केला जायचा. त्यानंतर याच्या रचनेत खूप बदल करण्यात आले. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला या बॉलला 'फेदरी' म्हटलं जायचं. असे बॉल तयार करणं खूप कठीण काम होतं. त्यांची देखरेख करतानाही खूप अडचणी यायच्या. म्हणूनच ते खूप महागही होते. बरीच वर्षं त्यांचा वापर केल्यानंतर सिंथेटिकपासून बॉल बनवायला सुरूवात झाली.

फन टाईम

'विम्बल्डन' ही टेनिसमधली महत्त्वाची ग्रँडस्लॅम स्पर्धा. या स्पर्धेत पिवळ्या बॉलचा वापर केला जातो. १८७७ ते १९८५ पर्यंत या बॉलचा रंग पांढरा होता. पण टीव्हीच्या प्रेक्षकांना बॉल नीट दिसावा यासाठी त्याचा रंग बदलण्यात आला. १९८६ मध्ये या स्पर्धेत पहिल्यांदाच पिवळा बॉल वापरण्यात आला. यामुळे प्रेक्षकांना बॉल व्यवस्थित दिसू लागला.

घ्या भरारी

छोट्यांनो, तुम्ही विमानात बसला असाल. आकाशात उडणारं विमान पाहून किती मस्त वाटतं. विमानात बसताना जेवढी मजा येते तेवढीच ते चालवतानाही येईल का? मोठे झाल्यावर तुम्हीही विमान चालवू शकता. यासाठी अर्थातच विमान चालवण्याचं प्रशिक्षण म्हणजे 'पायलट ट्रेनिंग' घ्यायला हवं. आपल्या देशात आता विमान वाहतूक स्वस्त झाल्याने लोक रेल्वेऐवजी विमानाने प्रवास करतात. म्हणूनच सरकारनेही विमानतळांच्या निर्मितीवर भर द्यायचं ठरवलं आहे. पुढच्या १५ ते २० वर्षांत देशात २०० नवी विमानतळं तयार होतील.

हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात करीअरचे अनेक पर्याय असले तरी अंगात धाडस आणि जगावेगळं काही करण्याची इच्छा असेल तर 'कमर्शियल पायलट' बनण्याचा पर्याय तुमच्याकडे आहे. पालयट बनल्यानंतर फक्त विमान सेवा देणाऱ्या कंपनीचं विमान चालवणं गरजेचं नाही. याशिवाय अनेक वेगळे पर्याय तुमच्याकडे आहेत.

बारावी विज्ञान शाखेतले विद्यार्थी या करीअरचा विचार करू शकतात. फिजिक्स, गणित आणि केमिस्ट्री हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. सोळाव्या वर्षानंतर तुम्हाला विद्यार्थ्यांसाठी असलेला पायलट लायसन्स मिळू शकतं. तर खाजगी पायलट लायसन्ससाठी १७ वर्षं पूर्ण व्हायला हवी. कमर्शियल पायलट बनण्याचा विचार अठराव्या वर्षानंतर करता येईल. बारावीनंतर

कोण होणार?

'फ्लाईंग स्कूल'मध्ये प्रवेश घेऊन 'एव्हिएशन'मध्ये बीएससी करावं लागेल. संस्थांमध्ये प्रवेश घेताना लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी घेतली जाते. मुलाखत आणि वैद्यकीय चाचणी घेतली जाते. पदवी मिळवल्यानंतर तुम्ही 'कमर्शियल पायलट' म्हणून काम करू शकता.

योगा टाईम

ब्लू फुटेड बूबी

'ब्लू फुटेड बूबी' हा अनोखा पक्षी आहे. 'गॅलापागोस'च्या बेटांवर तो आढळतो. 'बोबो' या स्पॅनिश शब्दावरून त्याला 'बूबी' हे नाव मिळालं. 'बोबो' या शब्दाचा अर्थ मूर्ख माणूस. हे पक्षी बावळट किंवा मूर्ख नसतात. पण त्यांच्या वागणुकीमुळे त्यांना हे नाव मिळालं. त्यातच निळ्या पायांमुळे 'ब्लू फुटेड बूबी' ही ओळख त्यांना मिळाली. लांब मान, टोकदार, रुंद चोच ही या पक्ष्याची वैशिष्ट्य.

खादाडी

फ्रुटी तोफू स्मूदी

छोट्यांनो, 'फ्रुटी तोफू स्मूदी' हा खूप चांगला आणि झटपट होणारा ऑप्शन आहे. यासाठी पाउण कप ॲपल ज्यूस, अर्धा कप मऊ तोफू, एक कप ताज्या बेरी, एक केळं, फ्रूट फ्लेवर्ड योगर्ट, एक चमचा मध आणि चार बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या. ॲपल ज्यूस, केळं, बेरी, मध आणि तोफू हे सगळं साहित्य ज्यूसरच्या भांड्यात घाला. नीट फिरवून घ्या. या भांड्यात बर्फाचे तुकडे घालून पुन्हा फिरवून घ्या. तोफू स्मूदी तयार. ग्लासमध्ये ओता. गारेगार प्या.

एक्झॅम टाईम

करा उजळणी

दोस्तांनो, तुम्ही वर्षभर अभ्यासाचा भरपूर सराव केला असेल. वाचन केलं असेल. पण आता या सगळ्याची उजळणी करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे इंटरनेट, स्मार्टफोन बंद करून तयारीला लागा. परीक्षा जवळ आल्याने तुम्हाला उसंत मिळत नसेल. भरपूर गुण मिळवण्यासाठी आधी वाचलेल्या धड्यांची, शिकलेल्या गणितांची उजळणी करायला हवी. सकाळी लवकर उठून अभ्यासाला लागा. नऊ वाजता अभ्यासाला सुरूवात करा. यामुळे परीक्षेपर्यंत सर्व विषयांची उजळणी पूर्ण होईल.

योगा टाईम

करा स्वस्तिकासन

शरीर बळकट करण्यासोबतच सर्व प्रकारच्या रोगांना लांब ठेवण्यासाठी 'स्वस्तिकासन' करा. स्वस्तिक अत्यंत शुभ मानलं जातं. मंगल प्रसंगी घराबाहेर स्वस्तिक काढतात. तसंच हे आसन आहे. स्वस्तिकासन नियमितपणे केल्यामुळे आपली आत्मिक प्रगती होते. मानसिक समाधान लाभत. आपल्या मानसिक आरोग्यासाठी हे आसन खूप लाभदारी ठरतं.

फ्लॉवरपॉट कार्ड

स्वत: घडवलेली वस्तू आपल्याला आनंद देऊन जाते. त्यातही ते शुभेच्छापत्र किंवा ग्रीटिंग कार्ड असेल तर भावना व्यक्त करण्याचं उत्तम माध्यम मानलं जातं. हातांनी बनवलेलं ग्रीटिंग कार्ड प्रत्येकाला आवडतं. वाढदिवस किंवा इतर प्रसंगी आपण असं छानसं कार्ड भेट म्हणून देऊ शकतो. फ्लॉवरपॉट कार्ड कसं बनवायचं ते शिकायचंय?

साहित्य: पुठ्ठा किंवा बॉक्स कार्डबोर्डचा एक तुकडा, रंगीत कार्डपेपरचे चार तुकडे, २५ सेंटीमीटर दोरा, मार्कर पेन, गम आणि कात्री

कृती: कार्डबोर्डच्या एका कोपऱ्यात फ्लॉवरपॉटसारखा आकार काढा. हा आकार दुमडून दुसरा आकार तयार करा. आता दुहेरी फ्लॉवर पॉट तयार होईल. रंगीत कार्डपेपरची फुलं बनवा. कार्डपेपरवर फुलांचं चित्र काढून तो भाग कापून घ्या. प्रत्येक फुलावर संदेश लिहा. सेलोटेपच्या मदतीने प्रत्येक फूल चिकटवून घ्या. दोऱ्यावर फुलं चिकटवायची आहेत हे लक्षात घ्या. धाग्याच्या शेवटच्या टोकाला सेलोटेप चिकटवून फ्लॉवरपॉटच्या आतल्या भागाला ही फुलं चिकटवा. दोन्ही फ्लॉवरपॉट्सची टोकं गमने चिकटवा. पण वरचा भाग उघडा ठेवा. आता तुमचा संदेश फ्लॉवरपॉटच्या आत सरकवा. वरती दोरा दिसू द्या. दोरा ओढला की संदेश वाचता येईल. या प्रकारची वेगवेगळी ग्रीटिंग कार्डस तयार करून भेट म्हणून द्या.

करून पहा

सवयींनुसार अनलॉक होणार फोन!

दोस्तांनो, फोन लॉक तसंच अनलॉक करण्यासाठी विविध तंत्र वापरली जातात. काही वर्षांपूर्वीपर्यंत फोनवरची बटणं दाबून तो लॉक आणि अनलॉक केला जायचा. नंतर स्मार्टफोन्स आले. मग सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. मोबाईल बनवणाऱ्या कंपन्यांनी वेगळ्या कल्पना लढवून लॉकिंगच्या वेगवेगळ्या पद्धती विकसित केल्या. 'फिंगर प्रिंट सेंसर्स', 'फेस अनलॉक', 'व्हॉईस अनलॉक'मुळे बरंच काही सोपं झालं. आता याचा पुढचा टप्पा म्हणजे 'बिहेवियरल बायोममेट्रिक' तंत्रज्ञान. म्हणजेच पुढच्या काळात युजरच्या वागणुकीची दखल घेऊन फोन अनलॉक होईल.

स्मार्टफोन, टॅबलेट, नोटबुकसारख्या गॅझेट्समध्ये हे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. युजरची स्वाईप, स्क्रॉल करण्याची पद्धत तसंच इतर हालचाली फोन टिपेल. तुमची वागणूक, सवयी जुळल्याशिवाय फोन अनलॉक होणार नाही. या तंत्रज्ञानात स्मार्टफोनचे 'की स्ट्रोक डायनामिक्स', 'सिग्नेचर ॲनालिसिस ' इत्यादी अल्गोरिदमच्या माध्यमातून रेकॉर्ड होईल. मग युजरच्या हालचाली विचारात घेतल्या जातील.

व्हॉट्स न्यू?

या तंत्रज्ञानात अर्थातच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात आला आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपला फायदा होत असला तरी गैरप्रकारही घडतात. 'सिम क्लोनिंग'सारख्या प्रकारांनी युजरची माहिती मिळवली जाते. त्यांच्या बँक खात्यांमधून पैसे काढले जातात. पण फोन लॉकिंगच्या या नव्या पद्धतीमुळे हॅकर्सच्या अडचणी वाढणार आहेत. म्हणून मुलांनो, पुढच्या काळात फोन घेतल्यानंतर तुमच्या सवयी बदलू नका. बदलल्या तर ही माहिती लगेच फोनमध्ये नोंदवा. नाहीतर फोन अनलॉक करताना बराच गोंधळ होईल.

ठिपके जुळवा

प्रथिनं आहेत महत्त्वाची

मुलांनो, प्रथिनं हा आपल्या आहारातला खूप महत्त्वाचा घटक. जेवणातून प्रथिनं शरीरात जायला हवी. तुमच्यासारख्या वाढत्या वयाच्या मुलांनी तर प्रथिनं खायला हवी. दूध, अंडी, मासे, चिकन, विविध फळं,धान्य आणि भाज्यामधून ही प्रथिनं मिळत असतात. अर्थात त्यांचंही एक प्रमाण आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच. तसंच हा घटक आहारातून कमी करणंही चुकीचं आहे. चला तर मग कोणत्या वयात किती प्रथिनं खायला हवी याविषयी जाणून घेऊ या.

४ ते ८ या वयोगटातल्यला मुलांनी १९ ग्रॅम प्रथिनं खायला हवी. तुमचं वय ९ ते १३ वर्षांचं असेल तर ३४ ग्रॅम प्रथिनं खाणं गरजेचं आहे. १४ ते १८ हा काळ मुलांच्या वाढीच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा असतो. त्यामुळे या वयात मुलांनी ५२ ग्रॅम तर मुलींनी ४६ ग्रॅम प्रथिनं घ्यायला हवी.

प्रथिनांची ही गरज भागवण्यासाठी अर्थातच तुम्हाला आरोग्यदायी पदार्थ खायला हवे. प्रथिनांची गरज भागवण्यासाठी दिवसातून दोन वेळा संतुलित आहार घ्या. जेवणात पोळी, भाजी, आमटी, भात, ताक, कोशिंबिर असे पदार्थ खा. पिझ्झा, बर्गर, वेफर्स, फ्रेंच फ्राईजसारखं जंक फूड टाळा. चीजमध्ये प्रथिनं असल्याने ते खाता येईल.

हेल्थ वेल्थ

तसंच मधल्या वेळेत चणे, दाणे, सुकामेवा खा. दाण्यांमधूनही भरपूर प्रथिनं मिळतात. डाळी हा प्रथिनांचा मुख्य स्रोत आहे. रोज सकाळी आणि संध्याकाळी दूध प्या. अंडी आवडत असतील तर तीही खाता येतील. प्रथिनांची गरज भागवण्यासाठी बरेच जण प्रोटिन शेक पितात. प्रोटिन पावडरचा वापर केला जातो. पण शक्यतो हे टाळा. वाढत्या वयात जास्त प्रथिनयुक्त घटक खाल्ल्याने पुढे त्रास होऊ शकतो. त्यामुळे प्रथिनं चांगली म्हणून ती भरपूर प्रमाणात खाऊ नका.

जिज्ञासा

ओळखा पाहू

१) सर एडमंड हिलरी यांनी 'माउंट एव्हरेस्ट' कोणत्या वर्षी सर केलं?
२) मानवी हक्क दिन कधी असतो?
३) महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा आहेत?
४) 'इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोलियम' कुठे आहे?
५) जगातलं सर्वाधिक गर्दीचं विमानतळ कोणतं?
६) पहिल्या 'आफ्रो-आशियाई'क्रीडा स्पर्धांचं आयोजन कुठे करण्यात आलं होतं?
७) 'स्पुटनिक १' हा उपग्रह कोणत्या वर्षी आकाशात सोडण्यात आला?
८) इलेक्ट्रॉन्सचा शोध कोणी लावला?
९) भारतरत्न पुरस्कार मिळवणारी पहिली परदेशी व्यक्ती कोण?
१०) फिजिक्समध्ये नोबेल पुरस्कार मिळवणारी पहिले आशियाई आणि भारतीय शास्त्रज्ञ कोण?

उत्तर : १) १९५३ २) १० डिसेंबर ३) ४२ ४) देहरादून ५) 'हीथ्रो-नॅशनल ॲटलांटा' ॲटलांटा ६) १९५७ ७) नॅ. नॅ. थ्यिमया १) खान अब्दुल गफार खान १०) सी.व्ही. रमन

चित्र रंगवा



कलासक्त

अनुपम अभिनयाची परिसिमा सौंदर्यवती

शर्मिला टैगोर

श्रीराम शेटये

चित्रपटाचा नायक आपल्या एका मित्रासोबत शानदार जीपमधून प्रवास करीत आहे. वळणदार रस्ता दार्जिलिंगच्या नयनरम्य नैसर्गिक डोंगराळ घाटातून वळणे घेत घेत जाणारी त्याची गाडी. समोर समांतर रेषेतील थोड्या वळसे घेणाऱ्या लोहमार्गावरून एक आगगाडी धूर सोडत चालली आहे. त्या आगगाडीच्या खिडकीकडील सीटवर बसून एक सुंदर तरूणी प्रवास करीत आहे. तिच्या भालप्रदेशावर रूपेरी केसांच्या छान बटा वाऱ्याने रूळत आहेत. त्या उडणाऱ्या केसांच्या बटांमुळे तिचे सौंदर्य अजूनच खुलून दिसत आहे. तिच्या गालावरची खळी वेड लावणारी आहे. ती तरूणी अलेस्टर मॅकलेनचे पूस्तक वाचण्यात दंग आहे. जीपमधून प्रवास करणाऱ्या त्या तरूणाचे लक्ष त्या आगगाडीतील तरूणीवर आहे. तो तिच्यावर फिदा झाला आहे. तो तरूण तिच्याकडे पाहून आपल्या गाण्यातून तीला छेडण्याचा प्रयत्न करत आहे. अर्थात तिही त्याला पहाते आहे. वारंवार हळूवार चोरून चोरून पहाते आहे गाण्याच्या दिशेने. परंतु, पाहून न पाहिल्यासारखे दाखवत ती पुस्तक वाचण्यात दंग असल्याचे भासवत आहे. खूपच मस्त नजारा होता तो. 'मेरे सपनोकी राणी कभी आयेगी तू' हे त्या गाण्याचे बोल आहेत.

सन १९६९ मध्ये प्रदर्शित झालेल्या आराधना चित्रपटातील हे दृष्य आहे. नायक होता राजेश खन्ना आणि नायिका होती शर्मिला टैगोर. गीतकार आनंद बक्षी यांच्या गाण्याला एस. डी. बर्मन यांनी अप्रतिम संगीतबद्ध केले आहे. किशोरकुमार यांनी या गाण्यात तर धमाल उडवून दिली आहे. किशोरकुमार आधीच इरसाल गायक. गाण्याचे नैसर्गिक लोकेशन निसर्गरम्य आहे. अंत्यत कौशल्यपूर्ण चित्रीकरण, राजेश खन्ना आणि शर्मिला टैगोरसारखे मनमोहक नायक आणि नायिका या सगळ्या गोष्टींमळे गाणे अंत्यत वास्तवदर्शी झाले.

ते इतके सुपरहिट ठरले की शब्दात वर्णन करणे अवघड आहे. पण ते गाणे आणि तो चित्रपट इतका हीट झाला की राजेश खन्नाच्या डोक्यावर सुपरस्टारचा ताज चढला. शर्मिला टैगोरसुद्धा मोठी स्टार म्हणून या चित्रपटापासून नावारूपाला आली. किशोर तर किशोरच होता त्याच्याबद्दल काय सांगणार? परंतु हे गाणे आणि चित्रपट ऐतिहासिक ठरले. हे गाणे इतक्या वर्षानंतरही तरोताजा आहे. अनेक रसिकांच्या ओठावर रेंगाळतेयं. या गाण्याच्या चित्रिकरणाची कहाणी देखील अशीच अद्भूत आहे. हे गाणे दार्जिलिंगच्या निसर्गसंपन्न वातावरणात चित्रित करण्यात आले. परंतू शर्मिला टैगोरकडे चित्रिकरणासाठी डेट उपलब्ध नव्हती. सत्यजित रे यांच्या चित्रपट शुटींगमध्ये शर्मिला बीझी होती. राजेश खन्नाची ही सपनोकी राणी स्वप्नातच राहिली आणि एकट्या राजेश खन्ना याच्यावर हे गाणे दार्जिलिंगमध्ये चित्रित करण्याची वेळ आली. ही दोन्ही दृष्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी चित्रित करण्यात आली. मुंबईच्या स्टुडिओत आगगाडीचा सेट लावण्यात आला व शर्मिलाचे शुटींगनंतर मुंबईत झाले. मग हे दोन्ही सीन एडिट करून तुमच्यासमोर हे गाणे आले. अर्थात आपल्या उत्कृष्ट अभिनयाने हे गाणे शर्मिला टैगोर यांनी इतके एकजीव केले की हे दोन वेगळे सिन आहेत याची कल्पना प्रेक्षकांना येत नाही.

अर्थात महान सिनेमॅटोग्राफर अलोकनाथ गुप्ता यांच्या कॅमेऱ्याची कमाल आणि साईल पृथ्वीराजा यांच्या एडिटींगची ही जादू आहे त्याचे श्रेय त्याना द्यायलाच हवे. त्या काळात आता एवढे प्रगत सॉफ्टवेअर नव्हते तरीही किती कौशल्याने एडिटींग केली आहे?

शर्मिला जितकी सौंदर्यवती होती तितकीच अप्रतिम असामान्य अभिनय कौशल्याने परीपूर्ण होती. सुंदर कमनीय बांधा, जीवाला वेड लावणारी हेअरस्टाईल. ती हसली की तिच्या गालावरची ती खळी अनेकांची हृदये खल्लास करून टाकायची. तीच एखाद्या भूमिकेत शिरन लाजवाब असायच. आराधनामधले तिचे प्रेमप्रसंग किंवा नवरा अचानक विमान अपघातात वारल्यावर येणारे दुःख, मुलाला वाढवताना होणारी परवड, सगळ सगळ तिने आपल्या ताकदवान अभिनयाने उभं केलय त्याला तोड नाही.

तसाच ेतचा आणखीन एक अभिनयाचा कस लागणारा चित्रपट म्हणजे 'तलाश'. इथे एक सांगायलाच हवे ते म्हणजे. तो जुना काळ भारतीय चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ होता. १९४० ते १९७० च्या काळात या इंडस्ट्रीत अनेक प्रतिभावान आर्टिस्ट होते. लेखक, दिग्दर्शक, सिनेमॅटोग्राफर संगीतकार, शायर, गीतकार एकापेक्षा एक होते म्हणूनच या काळातील सर्वच चित्रपट त्यांची कथा, पटकथा, संवाद, संगीत, गाणी, चित्रीकरण सर्वच दर्जेदार आहे. सर्व ऐतिहासीक आणि अजरामर आहे. त्यातील संगीत, त्यातील गाणी, डायलॉग्स आजही लोक आवडीने ऐकतात.

मी 'तलाश' या राजेन्द्र कुमार आणि शर्मिला टैगोर यांच्या चित्रपटाबाबत बोलत होतो. हा चित्रपट अप्रतिम आहे. शर्मिला टैगोर हीची दुहेरी भूमिका आहे. या चित्रपटात नायिका असलेली शर्मिला टैगोर नायक राजेंद्र कुमार याच्या प्रेमाची परीक्षा घेण्यासाठी वेग वेगळी दोन रूपे घेताना दाखविली आहे. एक गावात रहाणारी पारंपरिक वेशभूषेतील तरूणी नायकाच्या प्रेमात पडते. नायक नक्की आपल्याशी एकनिष्ठ आहे ना हे पहाण्यासाठी एक शकल लढविते. नायक जेव्हा कामानिमित्त बाहेरगावी जातो तेव्हा अत्यंत मॉर्डन रूप घेतलेली नायिका आपले रूप बदलून नायकाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा आटोकाट प्रयत्न करते. नायक तिला ओळखू शकत नाही. ती त्याच्या बॉसची मुलगी दाखविली आहे. आपल्या पूर्वीच्या प्रियसी सोबत एकनिष्ठ रहाण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. परंतु त्याचे मन मात्र नवीन तरूणीवर आकर्षित झालेले असते. खूप प्रयत्न करूनही एक दिवस त्याचे मन तिच्यावर आकर्षित होतेच. पण त्याला आईचे शब्द आठवतात. त्याच्या आईने त्याला शिकवण दिलेली होती. मन आणि आत्मा यामध्ये कधी संघर्ष झालाच तर मन सांगेल ते करू नकोस आत्मा जे सांगेल ते कर. आत्म्याचा आवाज ऐक. मन तुला भटकवेल पण मनाचे ऐकू नकोस आत्म्याचे ऐक. तोच खरा परमात्म्याचा आवाज आहे. नायक माघार घेतो आपण केलेली चूकी त्याला कळते. आणि तो मोहातून बाहेर पडतो. एवढ्यात त्याला आई वारल्याची बातमी येते. आपल्या मनात परस्त्रीबद्दल पाप आले आपण आईचे शब्द ऐकले नाही. आपण आत्म्याचे न ऐकता मनाचे ऐकून क्षणभर का होईना आपण मोहात पडलो. म्हणून आई गेली असा विचार करून नायक हताश व दुःखी होतो.

शर्मिला टैगोर हिने केलेल्या दुहेरी भूमिका लाजवाब आहेत. दोन्ही भूमिकात आपल्या अष्टपैलू अभिनयाची छाप शर्मिला टैगोर हीने सोडली आहे.

शर्मिला टैगोर हिचा जन्म सन १९४६ मध्ये हैदराबाद इथे झाला होता. तिचे वडील जितिनदरनाथ टैगोर एल्गिन मिल्स या इस्ट इंडिया कंपनीच्या मिलचे जनरल मॅनेजर होते. शर्मिला टैगोर गुरूदेव रविंद्रनाथ टैगोर यांच्याच घराण्यातील आहे. शर्मिला टैगोर हिच्या चित्रपट करिअरची सुरुवात वयाच्या १४ व्या वर्षी सुप्रसिद्ध महान बंगाली चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांच्या बंगाली महाकाव्य नाटक 'द वल्ड ऑफ अपू' (१९५९) मधून झाली. बंगाली चित्रपट देवी(१९६०), नायक (१९६६), अरण्यार दिन राती (१९७०), सीमाबाधा (१९७०) अशा सत्यजित रे यांच्या अनेक बंगाली चित्रपटात काम करून बंगाली चित्रपट विश्वात शर्मिला टैगोर यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. शक्ती सामंत यांच्या 'कश्मीर की कली'(१९६४) या चित्रपटातून हिंदी चित्रपट सृष्टीत शर्मिला टैगोर हीचा प्रवेश झाला. हिंदीत आल्यावर तिची कारकिर्द अजूनच बहरली. वक्त (१९६३),अनुपमा (१९६६), एन इव्हिनींग इन पॅरिस (१९६७), सत्य काम (१९६९),आराधना (१९६९) या चित्रपटांनी तिने स्वतःला आघाडीची अभिनेत्री असल्याचे सिध्द केले. राजेश खन्नासोबत तिची जोडी उत्तम जुळली होती.बॉक्स ऑफिस इंडियाच्या १९७३ साली प्रसिद्ध झालेल्या यादीत शर्मिला टैगोर हिचा दुसरा क्रमांक होता. ही ७५ सर्वोत्कृष्ट बॉलीवुड अभिनेत्रींची यादी बनविण्यात आली होती.शम्मी कपूरसोबतच्या 'एन इव्हिनींग इंन पॅरिस' हा चित्रपटसुद्धा खूप गाजला. शर्मिला टैगोर हीने घातलेल्या बिकनी सूटमुळे त्या काळात खुपच चर्चा झाली होती.

या सौंदर्यवती अभिनेत्रीचा आवडता अभिनेता शशी कपूर होतो. अर्थात त्या काळातल्या आशा पारेख पासून कुठल्याही अभिनेत्रीला विचारल तर सर्व हेच म्हणतात की शशी कपूर हा आपल्या जमान्यातला सर्वात हँडसम मनमोहक अभिनेता होता. त्या काळातल्या सर्वच नायिका त्याच्यावर फिदा (क्रश) होत्या. परंतु शर्मिला टैगोर भारतीय क्रिकेटर नवाब पतौडी याच्या प्रेमात पडली. नवाब पतौडी याच्याशी लग्न करताना तिने आपला धर्म बदलून मुस्लिम धर्माचा स्वीकार केला. लग्नानंतर तिचे नाव बदलून बेगम आयशा सूलताना असे ठेवले. परंतु ते फक्त कागदोपत्रीच राहिले. चाहत्यांच्या हृदयात शर्मिला टैगोर हे नाव आणि तिची प्रतिमा कायम राहिली. शर्मिला टैगोर यांच्या उत्कृष्ट अभिनयासाठी त्याना नॅशनल अवॉर्ड्स आणि फिल्मफेअर अवॉर्ड्स देऊन गौरविण्यात आले. सन २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले. भारत सरकारच्या राष्ट्रीय सेंसर बोर्डच्या शर्मिला टैगोर ह्या सन २००४ ते सन २०११ या काळात अध्यक्ष होत्या.

आपल्या अनोख्या अदाकारीने आणि अभिनयाने शर्मिला टैगोर यांनी आपल नाव चित्रपट सृष्टीत सुवर्ण अक्षरात कोरले. ●●

११ क्षेत्रांतील मान्यवरांचा सुवर्णरत्न सन्मान पुरस्काराने गौरव!

माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरामध्ये चतुरंग प्रतिष्ठानचा दिमाखदार सुवर्ण महोत्सव सांगता सोहळा रंगला. अतिशय देखणा असा हा सोहळा पाहण्यासाठी रसिकांनी प्रचंड गर्दी केली होती. पुरस्कार सोहळ्याला मनोरंजनपर कार्यक्रमाची जोड दिल्याने हा सोहळा अधिकच रंगतदार ठरला. प्रेक्षकांनी या सोहळ्याला भरभरून दाद दिली.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी चतुरंगचे दिवंगत पायाभरणीकर असलेले स्व. गणेश सोळंकी, स्व. प्रफुल्ला डहाणूकर, स्व. विनोदभाई दोशी, स्व. एस. वाय. गोडबोले गुरुजी, स्व. विद्याधर गोखले(अण्णा), श्री. रमेशभाऊ महाजन यांच्या कार्याला कृतज्ञ वंदन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी 'चतुरंग सुवर्णरत्न सन्मान' समारंभ पार पडला. यामध्ये पं. उल्हास कशाळकर (गायन), पं. हरिप्रसाद चौरसिया (वादन), अशोक पत्की (संगीत दिग्दर्शन), महेश एलकुंचवार (साहित्य), दिलीप प्रभावळकर (नाटक), रोहिणी हट्टंगडी (चित्रपट), वासुदेव कामत (चित्रकला), चंदू बोर्डे (क्रीडा), डॉ. अनिल काकोडकर (संशोधन) बाबासाहेब कल्याणी (उद्योजकता), मेजर महेश कुमार भुरे (राष्ट्रीय सुरक्षा) या ११ क्षेत्रांतील नामवंत गुणवंतांच्या कारकिर्दीला 'चतुरंग सुवर्णरत्न सन्मान' प्रदान करून सलाम करण्यात आला. या सोहळ्याला ॲड. उज्वल निकम, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ अभिनेते राजदत्त, मोहन जोशी, मनोज जोशी, अशोक समेळ, दीपक करंजीकर, सुहास बहुळकर, जे बी जोशी, एअरमार्शल हेमन भागवत, विजय केंकरे, मृदुला दाढे जोशी, मिलिंद जोशी, देवकी पंडित, श्रुती भावे चितळे, डॉ सागर देशपांडे, विठ्ठल कामात, उदय देशपांडे आदी मंडळी उपस्थित होती. डॉ. मोनिका गजेंद्रगडकर यांनी महेश एलकुंचवार यांच्या वतीने, तर गणेश चंदन यांनी बाबासाहेब कल्याणी यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. मेजर महेश कुमार भुरे यांना पुरस्कार प्रदान करताना त्यांना रसिकांनी उभे राहून मानवंदना दिली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना प्रभावळकर म्हणाले की, वसंत कानेटकर यांच्या नावाचा पुरस्कार हा त्यांचा आशीर्वाद समजतो. आजवरच्या कारकिर्दीतील सर्व सह कलाकारांच्या वतीने पुरस्कार स्वीकारतो. तसेच सर्व नाटककाराना कृतज्ञातपूर्वक अर्पण करतो. लेखक असल्याने नि:शब्दतेतील बोलकेपणा समजतो असे म्हणत कधीच दिग्दर्शकाच्या कामात व्यत्यय आणत नसल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, मी लेखक आणि अभिनेता असल्याने लेखकाला काय म्हणायचे ते समजून घेता येते. व्यक्तिरेखेची तयारी करण्याबाबत सांगायचे तर वाचिक अभिनयातून गंगाधर टिपरे सापडले. अलबत्या गलबत्या मधील चेटकीण रंगभूषेतून समजत गेली. तयारीने रोल करायला आवडतात. झपाटलेलामधील तात्या विंचू सहजपणे करता आला, तर चौकट राजाधील रोल दबावाखाली केल्याचेही त्यांनी सांगितले. दिग्दर्शक विजय केंकरे यांनी दिलीप प्रभावळकर यांना प्रश्न विचारून दिलखुलास संवाद साधला.

माझा पुढचा जन्म महाराष्ट्रात व्हावा अशी इच्छा व्यक्त करत पंडित हरिप्रसाद चौरसिया म्हणाले की, इतकी वर्षे महाराष्ट्रात राहात असल्याने अलाहाबादमध्ये जन्मल्याचे विसरून गेलो. मी इथे का नाही जन्मलो असा प्रश्न नेहमी पडतो. माझा पुढचा जन्म महाराष्ट्रमध्ये व्हावा, असा रसिकांनी आशीर्वाद द्यावा असेही ते म्हणाले. प्रसिद्ध शास्त्रज्ञ ज्येष्ठराज जोशी काकोडकर यांना उद्देशून म्हणाले की, डॉ. काकोडकर आपल्या देशाचे 'ओपनहायमर' आहेत. काकोडकर म्हणाले की, चतुरंगसारखी संस्था सर्वांगीण कामे करत आहे. प्रत्येकाला आपली जागा दाखवण्याचे काम ही संस्था करत असल्याचेही ते गमतीने म्हणाले.

देवकी पंडित यांनी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्याबद्दल गौरवोद्गार काढत म्हणाल्या की, अशोक पत्की यांच्या संगीतात अभिजात संगीताचे बीज असल्याचे जाणवते. त्यामुळेच त्यांच्या संगीतरचना अजरामर होतात. राग संगीताचे भावविश्व त्यांच्या छोट्याशा रचनेतही पाहायला मिळते असेही त्या म्हणाल्या. यासोबतच देवकी यांनी आभाळमाया या गाजलेल्या मालिकेच्या शीर्षकगीताचे सुरेल सूर छेडले. चतुरंगच्या चतुर रसिकांनी त्यांना उत्स्फूर्तपणे दाद दिली.

ॲड. उज्वल निकम यांनी आपल्या अनोख्या वकिली शैलीत संवाद साधत रसिकांची मने जिंकली. ते म्हणाले की, वकिलाला भाषणाची आणि फुकट बोलायची सवय नसते, पण महनीय व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी इथे आल्याचे उज्वल निकम म्हणाले. इथे आल्याने आपणही चतुरंग बनल्याचेही ते म्हणाले.

विनोद तावडे यांनी पुरस्कार विजेते सर्व देव माझ्या पाठीशी होते अशी भावना व्यक्त केली. इथले चांगले ते घेऊन जाणार आहे. चतुरंगपासून कधीच दूर जाणार नाही. तरुण प्रेक्षकांची गती वाढविण्याकडे लक्ष द्यायला हवे असेही त्यांनी सूचित केले. डिजिटलचा अवलंब करायला हवा आणि चतुरंग आता दिल्लीत व्हायला हवा असेही ते म्हणाले.

चित्रपटांची निवड करताना आपण फारशी चुझी बनत नसल्याचे रोहिणी हट्टंगडी म्हणाल्या. छोटे पण चांगले रोल्स केले. नाटकांमध्ये माझ्यासाठी असलेलेच रोल ऑफर करण्यात आले. आपण दिग्दर्शकाची अभिनेत्री असल्याचे मान्य करते असे त्या म्हणाल्या. जयदेव यांनी कधीच मला दिग्दर्शक म्हणून काही सूचना दिल्या नाहीत असेही रोहिणी म्हणाल्या.

या सोहळ्याच्या पहिल्या दिवशी अभिनेत्री-नृत्यांगना शर्वरी जमेनीसने नृत्यवंदना देत अर्घ्य सादर केले. सौमित्र पोटेने 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील कलाकारांची मुलाखत घेतली. यात सचिन गोस्वामी, सचिन मोटे, पृथ्विक प्रताप, रोहित माने, शिवाली परब यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या दिवशी कविवर्य कुसुमाग्रज आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर समोरासमोर आले तर त्यांच्यामध्ये कशा प्रकारच्या गप्पा रंगू शकतात याची झलक दाखवणारा 'हा सूर्य... हाच चंद्र!' नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. धनश्री लेले यांनी लिहिलेल्या आणि दिग्पाल लांजेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या प्रयोगात अजय पूरकर आणि दीपक करंजीकर यांनी काम केले. प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे यांच्या आवाजात रसिकश्रोत्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या गाण्यांची 'ओठांवरची आवडती गाणी' ही संगीत मैफल रंगली. ●●

चतुरंग प्रतिष्ठानच्या सुवर्ण महोत्सव सांगता सोहळा संपन्न!

राम कोंडीलकर

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**–email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)